SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २२.०४.२०२६ | अंक नं. ०१९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
२०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

- उद्या -
गुरूपुष्यामृतयोग
शुभमुहूर्त सुवर्णखरेदीचा..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
- बुधवार चालू -

लई भारी ! १ नंबर
भारत देशकी सर्वतम श्रेष्ठ खुशबु
परिमल भारतवासि अगरबत्ती
भारतवासि २०, ३२, १०० ग्रॅम व २०० ग्रॅम मध्ये सर्व पुजा साहित्य दुकानात उपलब्ध
अगरबत्ती होलसेल व रिटेल साठी
केवल अगरबत्ती
आडते बाजार, हॉटेल रसरंग समोर, अ.नगर
खास उन्हाळ्यासाठी कुलर परफ्युम उपलब्ध

## शेअर बाजार उघडताच सेन्सेक्सची घसरण, इराण-अमेरिका तणावाचा फटका

मुंबई – पाकिस्तानच्या मध्यस्तीनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत युद्धविराम वाढवला आहे. यामुळे मध्य आशियातील तणाव तात्पुरता कमी झाला तर, जागतिक बाजारालाही दिलासा मिळाला पण, अजूनही कायम असलेली अनिश्चिततेचा परिणाम आशियाई आणि भारतीय बाजारात दिसून येत आहे. शेअर बाजाराच्या तेजीला ब्रेक लागला असून आठवड्याच्या तिसऱ्या दिवशी, २२ एप्रिल रोजी बीएसई सेन्सेक्स आणि एनएसई निफ्टी निर्देशांक मोठ्या घसरणीसह उघडले. बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचा सेन्सेक्स ३०० अंकांच्या घसरणीसह उघडला आणि अल्पावधीतच ७५५ हून अधिक अंकांनी खाली आला. त्याचवेळी, नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टी जवळपास २०० अंकांच्या घसरणीसह व्यवहार करत होता.

आयटी स्टॉक्समधील विक्रीने बाजाराला खाली खेचले आणि एचसीएल टेकचा शेअर उघडल्यानंतर लगेचच जवळपास १० टक्क्यांनी आपटला. भारतीय बाजारातील व्यवहारांची सुरुवात खराब झाली आणि काही मिनिटांत बघताच बघता पडझड आणखी तीव्र झाली.


## अहिल्यानगर शहर परिसरासह जिल्ह्यात अवकाळी पावसाची हजेरी

नगर – नगर शहर परिसरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात २१ एप्रिल रोजी रात्री अवकाळी पावसाने हजेरी लावली. विजांचा प्रचंड कडकडाट आणि वादळी वाऱ्यामुळे नागरिकांची चांगलीच धांदल उडाली होती. जिल्ह्यासह राज्यात २४ एप्रिल पर्यंत अवकाळी पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

शहरासह जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून अधूनमधून अवकाळी पाऊस होत आहे. २२ एप्रिल रोजी सकाळीच नगर तालुक्यातील काही भागात विजांच्या कडकडाटासह अवकाळी पाऊस झाला होता. रात्री ९.३० च्या सुमारास केडगाव परिसरात जोरदार पाऊस झाला. शहरात पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. नागापूर मंडलात ५ मिमी तर केडगाव मंडलात ०.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. या शिवाय चास कामरगाव, पारनेर तालुक्यातील सुपा परिसरातही पावसाने हजेरी लावली. श्रीगोंदा तालुक्यातील भानगाव, आढळगाव मंडलात १ – १ मिमी, कर्जत तालुक्यातील कोंभली ३.५, वालवड ३.५ मिमी, पाथर्डी तालुक्यातील तिसगाव मंडलात १.३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. हवामान विभागाने नगरसह राज्यातील अनेक जिल्ह्यात २४ एप्रिल पर्यंत सुसाट्याच्या वाऱ्यांसह मध्यम ते तीव्र पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. अनेक ठिकाणी गारपीटही होणार असल्याचा अंदाज देखील व्यक्त करण्यात आला आहे.

WE'RE HIRING
Join our Team !
Senior Accountants : 2 Post
B.com (3+yrs exp.)
M.Com (2+yrs exp.)
Junior Accountants : 3 Post
B.com (2+yrs exp.)
Required Skills -
TDS, GST & Payroll Compliance
Tally, MS Office & Advanced Accounting / AI Tools
English & Marathi Communication
Preferred Experience :
Hospitals, Pharmacy Stores, Manufacturing, CA Firms
1st Floor, Satguru Apartment, Opp. Anand Vidyalaya, Gulmohar Road, Savedi, A.nagar
Mo. 8208733924
aakashryemulco@gmail.com

- उद्या गुरूपुष्यामृतयोग -
सुवर्णखरेदीचा, सुवर्णयोग..



22 कॅरेट दागिन्यांच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
डबल शाईन योजना
दर वाढले तरी फायदा तुमचाच !
मजुरीवर 50% सूट मिळवा
सुवर्णसंचय योजना
12=13
योजनेचा लाभ घेण्यासाठी आजच शोरूमला व्हिजीट करा.
शुध्दता, विश्वासार्हता, पारदर्शकता
चंदुकाका ज्वेलर्स
वसंत टॉकिज रोड, अहिल्यानगर 0241-2321512 | बेलापुर रोड, श्रीरामपुर 02422-221512 | धामणगांव रोड, कडा 02441-239538
आमच्याकडे खरेदी केलेल्या सोने-चांदीच्या दागिन्यांची मोडतेवेळी घट धरली जात नाही.

9 वा वर्धापन दिन
याहून मोठं भाग्य कोणतं!
एक इवलासा जीव या जगात येतो, त्याच्या स्वागताचं आणि पहिल्या स्पर्शाचं भाग्य आम्हाला लाभतं, आमच्यासाठी ही सर्वात मोठी भाग्याची गोष्ट आहे.
सरस्वती हॉस्पिटलच्या पवित्र छत्राखाली आजवर हजारो स्वप्नांनी जन्म घेतला आहे. आणि ही सेवा-वाटचाल यापुढेही अखंड सुरू राहील. आपल्या विश्वासाबद्दल आम्ही आपले सदैव ऋणी आहोत. ९ व्या वर्धापन दिनानिमित्त सर्वांचे मनापासून धन्यवाद!



सरस्वती हॉस्पिटल
मॅटर्निटी होम ॲण्ड ॲडव्हान्स्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
लवकरच सज्ज होत आहोत नव्या रूपात - Saraswati Super Speciality Hospital
कृष्णाई निवास, भोपळे गल्ली, विशाल गणपती मंदिराजवळ, माळीवाडा, अहिल्यानगर.
फोन: 0241 - 2414747 मो. 838-1-838-838.
Design Addict

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## भावाच्या मारहाणीचा बदला घेण्यासाठी तरुणावर चॉपरने हल्ला; नालेगाव परिसरातील घटना

नगर –शहरातील नालेगाव परिसरातील जनकल्याण रक्तपेढीजवळ एका तरुणावर धारदार शस्त्राने वार करण्यात आल्याची घटना २० एप्रिल रोजी मध्यरात्री १२.३० च्या सुमारास घडली. या मारहाणीत करण दीपक लांडे (वय २१, रा. ठाणगे मळा, नालेगाव) हा जखमी झाला असून जुन्या वादातून आणि भावाला केलेल्या मारहाणीचा बदला घेण्यासाठी हा हल्ला केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

याप्रकरणी शिवाजी बाबुराव अनभुले (रा. कुंभार गल्ली, नालेगाव), संभाजी बाबुराव अनभुले (जनकल्याण रक्तपेढीजवळ, नालेगाव)आणि राहुल बाळासाहेब वाकळे (रा. नेप्ती नाका) या तिघांविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी करण लांडे हा रात्रीच्या सुमारास आपल्या घराकडे जात असताना आरोपी तेथे आले. आरोपी राहुल वाकळे हा दुचाकी चालवत होता, तर शिवाजी अनभुले याच्या हातात लोखंडी चॉपर होता. आरोपींनी फिर्यादीला गाठून काही समजण्याच्या आतच त्यांच्यावर पाठीवर आणि दंडावर वार केले. 'हा भावाला मारल्याचा बदला आहे' असे ओरडत आरोपींनी लाकडी दांडक्यानेही बेदम मारहाण केली.हल्ल्यानंतर जखमी तरुणाने आरडाओरडा केल्यामुळे आजूबाजूचे नागरिक जमा झाले, त्यानंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. जखमी तरुणावर मॅककेअर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांनी घटनास्थळी भेट दिली. सहाय्यक फौजदार गोरडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# कायनेटिक चौकात दररोज होतेय वाहतूकीची कोंडी, नागरिक हैराण

## तातडीने ठोस उपाययोजना करा अन्यथा तीव्र आंदोलन : नगरसेवक मयुर बांगरे



नगर – नगर शहरातील कायनेटिक चौक (नगर-पुणे रोड परिसर) येथे दररोज दुपारी व संध्याकाळच्या वेळेस मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून, सदर परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच गंभीर होत चालली आहे. या ठिकाणी वाहतूक शाखेकडून कोणतेही प्रभावी नियोजन किंवा नियंत्रण नसल्यामुळे स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये तसेच दररोज या वाहतूक कोंडीत अडकणारे वाहन चालक यांच्यात तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.


या चौकात यापूर्वी अनेक गंभीर व जीवघेणे अपघात घडलेले असून, निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. पुण्याकडून येणारी वेगवान वाहने तसेच दौंड रोडकडून येणारे जड व्यावसायिक ट्रक यामुळे या परिसरातील वाहतूक अत्यंत धोकादायक बनली आहे. परिणामी, ये-जा करणारे नागरिक, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुले यांना दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. सदर परिस्थितीकडे वारंवार दुर्लक्ष होत असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. उद्या पुन्हा एखादी दुर्दैवी घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील, असा इशारा नगरसेवक मयूर बांगरे यांनी दिला आहे.

याबाबत नगरसेवक बांगरे यांनी शहर वाहतूक शाखेच्या पोलिस निरीक्षकांना निवेदन दिले असून यात म्हंटले आहे की, या अत्यंत गंभीर विषयाची तात्काळ दखल घेऊन पुढील उपाययोजना त्वरित राबविण्यात याव्यात, त्यामध्ये सदर चौकात कायम स्वरूपी ट्रॅफिक सिग्नल यंत्रणा बसविणे, वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस कर्मचाऱ्यांची नियमित नियुक्ती करणे, वाहनांचा वेग नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना (स्पीड ब्रेकर, संकेतचिन्हे इ.) करणे.

तसेच, या समस्येचे दीर्घकालीन व परिणामकारक निराकरण करण्यासाठी हायवे प्राधिकरण, महानगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या संयुक्त सहकार्याने योग्य नियोजन करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अन्यथा, स्थानिक नागरिकांना पुढील काळात आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही नगरसेवक बांगरे यांनी दिला आहे.

# टंचाई असलेल्या ठिकाणचे टँकर प्रस्ताव तातडीने पाठवा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया



नगर – पाणीटंचाईचा काळ सुरू झाल्याने टँकरसाठी कोणाच्या शिफारशीची वाट न पाहता, ज्या ठिकाणी टंचाई आहे त्या ठिकाणचे टँकर प्रस्ताव तातडीने पंचायत समिती व तालुका महसूल प्रशासनाकडे सादर करावेत, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

पाथर्डी येथील तहसील कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांच्या अध्यक्षतेखाली शेवगाव-पाथर्डी तालुक्यातील पाणीटंचाईची आढावा बैठक पार पडली. त्याप्रसंगी डॉ. आशिया बोलत होते. यावेळी प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक, शेवगावचे प्रभारी तहसीलदार निलेश वाघमारे, शेवगावच्या गटविकास अधिकारी सोनल शहा, नायब तहसीलदार किशोर सानप, रवींद्र शेकटकर, मुख्याधिकारी संतोष लांडगे, सहायक कृषी अधिकारी वैभव थोरे तसेच तालुक्यातील सर्व विभागप्रमुख, तलाठी व ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, प्रांताधिकाऱ्यांना टँकर मंजुरीचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे प्रस्ताव तातडीने सादर करावेत. दिलेल्या पिण्याच्या पाण्याची तपासणी आरोग्य विभागाने दररोज करावी व यासाठी कर्मचारी नियुक्त करावेत. ग्रामसेवक व तलाठी यांनी याबाबत सतर्क राहावे.

दोन्ही तालुक्यांत ज्या ठिकाणी पाणीसाठा आहे, तेथे वीजपंपाची अनधिकृत वीजजोडणी तत्काळ खंडित करण्याचे निर्देश वीज वितरण कंपनीला देण्यात आले. पाण्याचा अनधिकृत उपसा होणार नाही याची जबाबदारी वीज वितरण कंपनी, जलसंधारण विभागाचे अधिकारी व संबंधित संस्थांनी घ्यावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिले.

पशुधनासाठी लागणाऱ्या चाऱ्याचे आणि पाण्याचे नियोजन करण्यात आले असून, टंचाईकाळात व त्यानंतरही पाण्याचा अवैध उपसा रोखण्यासाठी सर्व विभागांनी दक्षता घ्यावी.

तलावातील पाणीउपसा तत्काळ बंद करावा, अन्यथा संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल. टँकर भरतानाचे आणि रिकामा करतानाचे फोटो आवश्यक असून, तपासणीवेळी हे फोटो सादर करणे बंधनकारक राहील. नियमांचे पालन न केल्यास कारवाई करण्यात येईल. टंचाईकाळात सर्वांनी विशेष खबरदारी घेण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिल्या. बैठकीच्या प्रास्ताविकात तहसीलदार डॉ. उद्धव नाईक यांनी माहिती दिली, तर प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी आभार मानले.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांच्या हस्ते मंडळ अधिकारी व तलाठ्यांना लॅपटॉप व साहित्याचे वितरणही करण्यात आले.

## शहरातील पान टपऱ्यांवर अन्न व औषध प्रशासनाची छापेमारी

नगर – राज्य शासनाने प्रतिबंधित केलेल्या गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूच्या विक्री विरोधात अन्न व औषध प्रशासनाने २१ एप्रिल रोजी दुपारी ३ ठिकाणी कारवाई केली आहे. शहरातील माळीवाडा बस स्थानक परिसर आणि आशा चित्रपटगृहाच्या मागे असलेल्या पान टपऱ्यांवर छापे टाकून प्रशासनाने हजारो रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त केला आहे.

कोतवाली पोलीस ठाण्यात दाखल फिर्यादीनुसार, अन्न सुरक्षा अधिकारी किरण जगदाळे यांनी 'क्लासिक पान स्टॉल'वर छापा टाकला. तेथे नोमान नासिर सय्यद (वय २७) याच्या ताब्यातून २,१५० रुपयांचा विमल पानमसाला, व्ही-१ तंबाखू आणि माणिकचंद असा साठा जप्त करण्यात आला. दुसऱ्या कारवाईत अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार यांनी 'सारंग पान स्टॉल'वर छापा टाकून अरबाज शकील सय्यद (वय २८) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ४,३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे हा साठा गुजरात राज्यातून खाजगी वाहनाने (ट्रॅव्हल्स) आणल्याची कबुली आरोपीने दिली आहे.

तिसरी कारवाई आशा चित्रपटगृहाच्या मागे असलेल्या 'फेमस पान शॉप'वर करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकारी उज्वला पाटील यांच्या तक्रारीवरून दानिश जावेद बागवान (वय २५) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याच्याकडूनही विमल आणि सुगंधित तंबाखू जप्त करण्यात आली आहे. हे प्रतिबंधित पदार्थ मानवी आरोग्यास अत्यंत घातक असून त्यामुळे कर्करोगासारखे गंभीर आजार उद्भवू शकतात. हे माहित असूनही केवळ आर्थिक फायद्यासाठी या विक्रेत्यांनी शासनाच्या बंदी आदेशाचे उल्लंघन केले. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हे नोंदवले आहेत.

## शेतात काम करणाऱ्या सासू-सुनेला मारहाण करत दागिने लुटले

### चिचोंडी पाटील शिवारात भरदिवसा घडली घटना, दोघा चोरट्यांवर गुन्हा दाखल

नगर – शेतात काम करत असलेल्या सासू सुनेला दोघा चोरट्यांनी बेदम मारहाण करत त्यांचे अंगावरील सोन्याचे दागिने बळजबरीने हिसकावून पळवून नेल्याची घटना नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील शिवारात पिंपळा गावाकडे जाणाऱ्या रोड लगत २० एप्रिल रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

याबाबत ताराबाई मुरलीधर कोकाटे (वय ६५, रा.चिचोंडी पाटील, ता.नगर) यांनी २१ एप्रिल रोजी फिर्याद दिली आहे. चिचोंडी पाटील शिवारातील शेत गट क्रमांक ८०४ मध्ये पिंपळा जाणारे रस्त्याजवळ फिर्यादी आणि त्यांची सून काम करत होत्या. दुपारी एक वाजेच्या सुमारास दुचाकीवरून दोन अनोळखी व्यक्ती त्या ठिकाणी आल्या. या दोघांनी अचानक फिर्यादी महिलेवर लाकडी काठीने हल्ला चढवला, तसेच त्यांच्या सुनेलाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या हल्ल्यात फिर्यादींच्या दोन्ही कानांना आणि डाव्या पायाला गंभीर जखम झाली आहे.

या मारहाणीनंतर आरोपींनी फिर्यादींच्या कानातील सोन्याची कर्णफुले, गळ्यातील सोन्याचे मणी असलेली पोत आणि त्यांच्या सुनेच्या गळ्यातील सोन्याचे मणीमंगळसूत्र असा एकूण ७८ हजार रुपये किमतीचा ऐवज बळजबरीने ओरबाडून नेला. दागिने लुटल्यानंतर आरोपी दुचाकीवरून पिंपळा गावाच्या दिशेने फरार झाले. जखमींवर स्थानिक खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले असून, प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी, नगर तालुका पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणी २ अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९ (६) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे करत आहेत. भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी गस्त वाढवण्याची मागणी होत आहे.


## ॲड.रंगनाथ बिबे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – श्रीगोंदा, शिवाजीनगर येथील रहिवाशी ॲड. रंगनाथ नामदेव बिबे (वय ७२) यांचे २१ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर श्रीगोंदा अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. बिबे हे श्रीगोंदा नगरपालिकेचे माजी नगरसेवक होते. संकेत, सचिन बिबे तर संदिपा आटोळे यांचे ते वडील होत.

## सीताराम साबळे यांचे अल्प आजाराने निधन




नगर – आगरकर मळा, अहिल्यानगर येथील रहिवाशी सीताराम बाबुराव साबळे (वय ८०) यांचे २१ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम, अहिल्यानगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. जिल्हा विशेष लेखापरिक्षक सहकार खाते वर्ग-१ चे अधिकारी होते.

त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे उपप्राचार्य कैलास साबळे (सर) व मंत्रालय कक्ष अधिकारी महेश साबळे व सविता रासकर यांचे ते वडील होत.

## आत्महत्येप्रकरणी आरोपी निर्दोष

नगर – मौजे चांदा, ता. नेवासा येथील श्रीधर खंडु दहातोंडे यांची मुलगी छकुली उर्फ वर्षा हिचा विवाह दिपक शंकर वाघ, रा. नवनागापुर, ता. नगर, जि. अहिल्यानगर यांच्याबरोबर १५/०६/२०१९ रोजी झालेला होता. लग्नानंतर काही दिवस तिचे पती, सासू, सासरे यांनी तिला चांगले वागविले. त्यानंतर मात्र तिला लग्नात सोने दिले नाही, वस्तु दिल्या नाहीत, तसेच कुट्टी मशिन घेण्यासाठी पैशाची मागणी करुन तिचा मानसिक, शारिरीक छळ केला, तिला त्रास दिला, त्या कारणावरुन तिने ५/८/२०२० रोजी मौजे चांदा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर येथील सारंगधर दहातोंडे यांच्या विहीरीत उडी मारुन आत्महत्या केली. त्यावरुन ७/८/२०२० रोजी पती दिपक शंकर वाघ, सासरे शंकर तबाजी वाघ व सासू नंदा शंकर वाघ यांचे विरुद्ध सोनई पो.स्टे. येथे गुन्हा भा.द.वि. कलम ३०४(ब), ३०६, ४९८, ३२३, ५०४, ३४ अन्वये दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. थोरात यांनी करुन आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सदर खटला जिल्हा न्यायाधिश- क्र. १, नेवासा यांचे कोर्टात चालला. सबळ पुराव्या अभावी न्यायालयाने तीनही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. खटल्यात आरोपींच्या वतीने ॲड. राजेंद्र शेलोत व ॲड. हर्षल राजेंद्र शेलोत यांनी काम पाहिले.



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना रक्ताने लिहिले पत्र

राज्यातील शासकीय कर्मचारी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी संघर्ष करत आहेत. या सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी अशोक सूर्यभान मासाळ यांनी मुख्यमंत्र्यांना आपल्या रक्ताने पत्र लिहिले असून त्याचा फोटो मेल केला आहे. तसेच या पत्राची फ्रेम करून संघटने मार्फत ते मुख्यमंत्र्यांना पाठविले जाणार असल्याचे सांगण्यात आले.

# 'एससी' उपवर्गीकरण रद्द करावे अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा



अनुसूचित जाती (एससी) मध्ये उपवर्गीकरण करण्याच्या निर्णयाविरोधात ऑल इंडिया पँथर सेनेने तीव्र भूमिका घेतली असून हा निर्णय तात्काळ रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, मुख्य सचिव तसेच संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

श्रीगोंदा – अनुसूचित जाती (एससी) मध्ये उपवर्गीकरण करण्याच्या निर्णयाविरोधात ऑल इंडिया पँथर सेनेने तीव्र भूमिका घेतली असून हा निर्णय तात्काळ रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, मुख्य सचिव तसेच संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, एससीमधील उपवर्गीकरणाचा निर्णय हा सामाजिक एकतेवर घाव घालणारा असून संविधानाच्या मूलभूत तत्वांच्या विरोधात आहे. या निर्णयामुळे अनुसूचित जातींमध्ये फूट पडण्याची शक्यता निर्माण झाली असून तो पूर्णपणे अन्यायकारक असल्याचे संघटनेने नमूद केले आहे. आमच्या ताटाचे तुकडे करू नका, तुकडे झाल्यावर ते ताट राहत नाही, अशा शब्दांत या निर्णयाचा निषेध व्यक्त करण्यात आला आहे.

संघटनेची प्रमुख मागणी म्हणजे एससी उपवर्गीकरणाचा निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा. अन्यथा, लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ऑल इंडिया पँथर सेनेकडून देण्यात आला आहे.

यावेळी ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष अमर घोडके, वंचित बहुजन आघाडीचे भीमराव घोडके, मुकुंद सोनटक्के, अंबादास घोडके, संजय रनसिंग, पवन रणदिवे, ॲड.विनोद उजागरे, संतोष भोसले, दादाराम रनसिंग, नितीन जावळे सह ऑल इंडिया पँथर सेना सहित आंबेडकरवादी कार्यकर्ते उपस्थित होते

**श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (एसएआरसी)**

SHRIRAM Asset Reconstruction

(विविध SRPL ट्रस्टचे विश्वस्त या नात्याने)

नोंदणीकृत कार्यालय: श्रीराम हाऊस, नं.४, बर्कित रोड, टी. नगर, चेन्नई - ६०००१७. कॉर्पोरेट कार्यालय: युनिट नं. एफएफ-ए-०५, ए विंग, पहिला मजला, आर्ट गिल्ड हाऊस, फिनिक्स मार्केट सिटी, एलबीएस मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई-४०००७०, फोन नं-१८०० १२० २३८९; customercare@shriramarc.com

**सार्वजनिक सूचना : स्थावर मालमत्तेच्या ई-लिलाव-सह-विक्रीची सूचना**

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये, परिशिष्ट-खत-नुसार सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ६, ८ (६) आणि ९ च्या तरतुदींसह वाचन करून, स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव.

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार, सह-कर्जदार आणि गहाणदार यांना सूचना देण्यात येत आहे की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता जी सुरक्षित कर्जदार, आता श्रीराम सेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड, विविध SARPL ट्रस्टचे विश्वस्त म्हणून कार्यरत आहे, यांच्याकडे गहाण/आरोपित आहे, ती SRFESI कायद्याच्या कलम (५) अंतर्गत नोंदणीकृत हस्तांतरण कराराद्वारे (यापुढे "SARPL" म्हणून संबोधले जाईल) आर्थिक मालमत्तेच्या हस्तांतरणानुसार गहाण ठेवण्यात आली आहे. श्रीराम सेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडने, खाली नमूद केलेल्या कर्जदार, सह-कर्जदार आणि गहाणदार यांच्यासह विविध कर्जदारांशी संबंधित आर्थिक मालमत्ता, त्यावरील मूळ सुरक्षा हितसंबंधांसह आणि त्यावरील सर्व हक्क, मालकी व हितसंबंधांसह, मूळ कर्जदाता/हस्तांतरणकर्ता ट्रुहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीचे नाव श्रीराम हाउसिंग फायनान्स लिमिटेड) यांच्याकडून संपादन केली आहे. या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा मूळ कर्जदाता/हस्तांतरणकर्ता/श्रीराम सेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (SARC), म्हणजेच सुरक्षित कर्जदाराच्या विश्वस्त पदावरील अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. SARC-Trust-5, कर्ज मंजुरीचे अभिहस्तांकिती (assignee), आणि अभिहस्तांकिती (ssignor), Truhome Finance Limited द्वारे वितरित केलेली मालमत्ता, खाली नमूद केलेल्या लिलाव वेळापत्रकानुसार जशी आहे तशी, जशी आहे तशी आणि जे काही आहे ते या तत्त्वावर विकली जाईल. ही विक्री कर्जदार, सह-कर्जदार आणि गहाण ठेवणारे यांच्याकडून थकीत रक्कम, त्यावरील पुढील व्याज, शुल्क, खर्च इत्यादींसह SARPL म्हणजेच सुरक्षित धनको (secured creditor) यांना वसूल करण्यासाठी केली जाईल. हे कर्जदार, सह-कर्जदार आणि गहाण ठेवणारे, जसे की सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८(६) आणि नियम ९(१) च्या तरतुदीनुसार तक्त्यात नमूद केले आहे, त्यांच्याकडून थकीत रक्कम वसूल करण्यासाठी केली जाईल. कर्जदार आणि जामीनदारांचा तपशील, देय रक्कम, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावर ज्ञात असलेले बोजे (असल्यास), राखीव किंमत, बयाणा रक्कम, वाढीव बोली, लिलावाची तारीख आणि तपासणीची तारीख खालीलप्रमाणे दिली आहे:

| कर्ज खाते क्रमांक, ट्रस्टचे नाव व हस्तांतरकाचे नाव / मूळ कर्जदात्याचे नाव | कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार/गहाण ठेवणाऱ्यांचे नाव | मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम-तारीख | राखीव किंमत (रु.) आणि बोली वाढ | लिलावाची तारीख आणि वेळ | संपर्क व्यक्ती तपशील- (एओ आणि विल्हेवाट पथक) |
|---|---|---|---|---|---|
| कर्ज खाते क्रमांक SHLH-AMDRO000691 अंतर्गत एसएआरसी ट्रस्ट-५ ट्रुहोम फायनान्स लिमिटेड | १. श्री.गायकवाड सचिन हरिभाऊ २. श्रीमती गायकवाड वैशाली सचिन | मागणी नोटीस दिनांक : १२.०५.२०२५ रक्कम ३७,६८,८१२/- (रुपये सदोतीस लाख अडोसष्ट हजार आठशे बारा फक्त) दि. ०७-०५-२०२५ | रु. २६,००,०००/- (सव्वीस लाख फक्त), बोली वाढ : रु. २६,०००/- (मूळ किंमतीच्या १%) | ११ मे २०२६ लिलाव वेळ : दु.१२.३० ते दु. १.३० | अश्फाक पत्का ९८१९४१५४७७ सुमेश मित्तल : ९९९३५८७७९७ मयुरेश जाधव ९८३३०१७२२१ गणपत कवठेकर ९७६४३३८८२२ मालमत्ता तपासणी दि. २७.०४.२०२६ दुपारी १२.०० वा., दुपारी ३.०० वा |
| ताबा तारीख आणि प्रकार | ज्ञात | | बयाणा रक्कम (ईएमडी) (रु.) | | |
| १६/०७/२०२५ प्रत्यक्ष ताबा | माहीत नाही | | ईएमडी (मूळ रकमेच्या १०%) रु. २,६०,०००/- (दोन लाख साठ हजार फक्त) ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : ८ मे - २०२६ वेळ: स.१० ते सायं. ५.०० | | |

**संपत्तीचे विवरण**

प्लॉट नं. १ वर रीतसर बांधलेल्या शिव कॉम्प्लेक्समधील, पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. १०३ असलेली ती सर्व स्थावर मालमत्ता, जिचे कार्पेट क्षेत्रफळ अंदाजे ५६.८९ चौ. मीटर, बांधकाम क्षेत्रफळ अंदाजे ६५.४२ चौ. मीटर, अंदाजित क्षेत्रफळ अंदाजे ७.७० चौ. मीटर आणि अगणनीय क्षेत्रफळ अंदाजे १०.८४ चौ. मीटर आहे. एकूण क्षेत्रफळ अंदाजे ३९९.४३ चौ. मीटर. शिव कॉम्प्लेक्समधील दुली कन्स्ट्रक्शन, प्लॉट नं.१, एकूण क्षेत्रफळ अंदाजे ८३.९७ चौ. मीटर. सर्वे नं.१२/४/८/१अ२ भिस्तबाग अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर तालुका नगर, जिल्हा-अहमदनगरच्या हद्दीत; पश्चिम- फ्लॅट क्र. १०२; दक्षिण- रस्ता; पूर्व- रस्ता; उत्तर- फ्लॅट क्र.१०.

विक्रीच्या सविस्तर अटी व शर्ती, बोली अर्ज आणि इतर माहितीसाठी, आमच्या लिलाव एजन्सी सी १ इंडिया प्रा. लि. च्या https://www.bankeauctions.com या वेबसाइटला किंवा/आणि/किंवा आमचे व्यावसायिक भागीदार मे. ट्रुहोम फायनान्स लिमिटेड यांना तक्त्यामध्ये दिलेल्या संपर्क क्रमांकांवर आणि/किंवा असाइनी/श्रीराम असेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडच्या https://www.shriramarc.com या वेबसाइटला भेट देऊ शकता.

२. इच्छुक बोलीदारांनी त्यांची ईएमडी (EMD) रक्कम SARC-TRUST-5 च्या नावाने डीडी (DD) द्वारे आणि/किंवा SARC-TRUST 5 मध्ये RTGS/NEFT द्वारे जमा करावी; बँकेचे नाव: आयसीआयसीआय बँक लिमिटेड; शाखेचा पत्ता: मुंबई - कमानी कुर्ला वेस्ट; बँक खाते क्रमांक: १९६२०५०००४६२८; आयएफसीएल कोड- ICIC0001962.

ठिकाण : अहमदनगर
दिनांक : २२.०४.२०२६

सही/- प्राधिकृत अधिकारी
(श्रीराम असेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड) विविध एसएआरपीएल ट्रस्ट विश्वस्त

# अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण तात्काळ करा

## अतिमागासांना न्याय देण्यासाठी वेगळे वर्गीकरण आवश्यक असल्याची भूमिका



अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण करून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी मानवी हक्क अभियान व अण्णाभाऊ साठे स्मारक समितीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

नगर – अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण करून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी मानवी हक्क अभियान व अण्णाभाऊ साठे स्मारक समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यासाठी संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन त्यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना निवेदन पाठविले.

यावेळी जिल्हाध्यक्ष लखन साळवे, जिल्हा संघटक अशोक भोसले, शहर संघटक पोपट भोसले, आसाराम साबळे, ॲड. अमित थोरात यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी त्यांनी राज्यातील अनुसूचित जातींना मिळणाऱ्या आरक्षणाच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा मांडत, त्यातील असमतोल दूर करण्याची गरज अधोरेखित केली.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या महत्त्वपूर्ण निकालात अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करता येते तसेच त्याचे अधिकार राज्य सरकारकडे असल्याचे स्पष्ट केले आहे. या निर्णयाच्या आधारे देशातील तेलंगणा, कर्नाटक, आंध्रप्रदेश, पंजाब आणि हरियाना या राज्यांनी आरक्षणाचे उपवर्गीकरण करून त्याची अंमलबजावणीही सुरू केली आहे.

मात्र महाराष्ट्रात अद्याप या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही, याकडे लक्ष वेधण्यात आले. राज्यातील अनुसूचित जातींच्या ६९ जातींपैकी केवळ एका जातीला मोठ्या प्रमाणात आरक्षणाचा लाभ मिळाल्याचे निदर्शनास येते, तर उर्वरित ५८ जातींना ५ टक्के देखील लाभ मिळालेला नाही, अशी गंभीर बाब निवेदनात मांडण्यात आली.

यामुळे काही समाजघटक प्रगत होत असताना अनेक समाज अतिमागास अवस्थेतच राहिले आहेत. हा असमतोल दूर करण्यासाठी प्रगत व अतिमागास घटकांचे स्वतंत्र उपवर्गीकरण करणे अत्यावश्यक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. विशेषतः मातंग समाजास न्याय मिळण्यासाठी उपवर्गीकरण तातडीने लागू करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# गृहिणी

## आरोग्य

### तोंडातील छाल्यांवर उपाय

उन्हाळ्यात होणारा आम्लपित्त, घसादुखी आणि तोंडातील छाल्यांवर सुटका मिळवण्यासाठी, वेलचीचा छोटा रूप एखाद्या औषधी खजिन्यापेक्षा कमी नाही. शरीरातील उष्णता वाढल्यामुळे तोंडातील व्रण खूप वेदनादायक असू शकतात. सूत्रांनुसार, साखरेच्या खड्यात वेलची मिसळून चघळल्याने व्रणांची जळजळ आणि वेदना त्वरित कमी होऊ शकते आणि ते लवकर बरे होऊ शकतात. शिवाय, वेलची तोंडातील जीवाणू आणि जंतुसंसर्ग नाहीसा करण्यासाठी प्रभावी आहे. जेवणानंतर दररोज वेलची चघळण्याची सवय लावल्यास तोंडाची दुर्गंधी दूर होण्यास आणि दात निरोगी राहण्यास मदत होते. वेलचीचा वापर अनेक प्रकारे करता येतो. ती थेट चावण्याव्यतिरिक्त, चहामध्ये घालून किंवा दुधात उकळूनही वापरता येते. उन्हाळ्यात, वेलचीचे दूध किंवा चहा शरीराला केवळ अंतर्गत थंडावाच देत नाही, तर मानसिक ताण कमी करण्यासही मदत करतो. तज्ज्ञांच्या मते, गंभीर आरोग्य समस्यांसाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक असले तरी, दररोज एक किंवा दोन वेलची खाणे हा एक चांगला प्रतिबंधात्मक उपाय आहे. आयुर्वेदात वेलचीला केवळ एक मसाला म्हणून नव्हे, तर औषधी गुणधर्मांचा खजिना मानले जाते. दररोज वेलचीचे सेवन केल्याने अनेक सामान्य आजारांपासून प्रभावीपणे आराम मिळतो. वेलची केवळ अन्नाची चव आणि सुगंधच वाढवत नाही, तर तिचे अँटीऑक्सिडंट आणि दाहशामक गुणधर्म शरीरातील अंतर्गत संसर्ग आणि सूज कमी करण्यास देखील मदत करतात.

## पाककला

### खजूर ओट कुकीज

**साहित्य :** खजूर प्युरी १२० ग्रॅम, ओट्स् १०० ग्रॅम, बेकिंग पावडर १/८ चमचा, डार्क चॉकलेट ३० ग्रॅम

**कृती :** सर्वात आधी एका भांड्यात खजूर प्युरी, ओट्स्, बेकिंग पावडर आणि डार्क चॉकलेट एकत्र करा आणि चांगले मिसळा. मिश्रण बटरने झाकलेल्या बेकिंग ट्रेमध्ये हलवा आणि हाताने कुकीज बनवा. ओव्हन गरम करा आणि कुकीज १०१५ मिनिटे बेक करा. ओव्हनमधून काढा आणि कुकीज थोडे थंड होऊ द्या. चला तर तयार आहे पौष्टिक असे खजूर ओट्स कुकीज रेसिपी, नक्कीच सर्व्ह करा.

## वास्तू

### आजारपण दूर करण्यासाठी

* आजारी व्यक्तीच्या उशाशी किंवा बेडच्या खाली एका काचेच्या वाटीत थोडे खडे मीठ ठेवा. मीठ झोपेत असताना शरीरातील आणि मनातील नकारात्मक ऊर्जा खेचून घेते. हे मीठ दर सकाळी बदलून नवीन ठेवावे. जुने मीठ हातात न घेता थेट विसर्जित करावे.

* एका छोट्या पितळी किंवा मातीच्या भांड्यात थोडे मीठ आणि त्यावर भीमसेनी कापूर जाळून संपूर्ण घरात त्याचा धूर दाखवा. यामुळे घरातील हवा शुद्ध होते.

## सौंदर्य

संत्र्याच्या वाळलेल्या सालीची पावडर त्वचेवर लावल्यावर, ती मृत पेशी काढून टाकण्यास आणि नवीन, ताजी त्वचा उघड करण्यास मदत करते. त्वचा ओलसर ठेवण्यासाठी संत्र्याचा रस देखील अत्यंत फायदेशीर मानला जातो.

## सल्ला

सूपमध्ये थोडा 'क्रंच' हवा असेल, तर तुम्ही वरून अक्रोडाचे किंवा बदामाचे बारीक काप टाकू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६

**गंगोत्पत्ती, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, पुनर्वसु २०।५७, सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** व्यापार-व्यवसायात स्थिती संमिश्र राहील. मानसिक स्थिती आनंददायक राहील. कार्यात विलंब झाला तरी यश मिळेल.

**वृषभ :** वैवाहिक जीवनात सुख मिळेल. आनंदाची बातमी मिळेल. निरुपयोगी गोष्टींकडे लक्ष देऊ नका. देवाण-घेवाण काळजीपूर्वक करा.

**मिथुन :** मागील उधारी उसनवारी वसूल होईल. शुभ वार्ता देखील मिळतील. एखादे कार्य झाल्यामुळे आनंदाचा अनुभव येईल.

**कर्क :** मित्रांचा सहयोग मिळेल. आरोग्य नरम-गरम राहील. खाण्या-पिण्याविषयीची पथ्य पाळावी लागतील. आरोग्य देखील उत्तम राहील. कौटुंबिक सहयोग मिळेल.

**सिंह :** आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. आर्थिक विषयांमध्ये देवाण-घेवाण टाळा. नोकरदारांनी इतर व्यक्तींची मदत घेऊन कामे करावी. बेपर्वाईने वागु नका.

**कन्या :** आर्थिक विषयांमध्ये स्थिती चांगली राहील. स्त्री पक्षाकडून लाभ मिळेल. कार्यालयामध्ये सहकार्य मिळेल.

**तूळ :** सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल साहाय्याबरोबर सन्मान वाढेल. आपणास समाधानकारक स्थिती मिळेल.

**वृश्चिक :** पैशासंबंधी स्थिती ठीक राहिल. इच्छित विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये वरिष्ठांचा सल्ला घेऊन पाउल टाका.


**धनु :** मोठ्यांचा सल्ला घ्या. आरोग्य चांगले राहील. एखाद्या जुन्या मित्राशी भेट होईल. आरोग्याच्या दृष्टीने ही वेळ उत्तम आहे.

**मकर :** मित्रांचा पाठिंबा मिळेल. भावनात्मकतेमुळे नुकसान होण्याची शक्यता आहे. काळजीपूर्वक कार्य करा. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील.

**कुंभ :** जोखीम असलेल्या कार्यात गुंतवणूक टाळा. आर्थिक स्थितीत हळू-हळू सुधार होईल.

**मीन :** कौटुंबिक विषयांमध्ये आशादायक काळ आला आहे. खर्च अधिक होईल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. संभाषणात सावधगिरी बाळगावी लागेल.

## शब्दगंध क्र. ७४१५ सौ.शैलजा कुलकर्णी



**शब्दगंध क्र. ७४१४ चे उत्तर**



**आडवे शब्द :-** १) जनावरांना चरण्यासाठी राखून ठेवलेले गवताचे कुरण ५) पोस्ट; डाक; मेल ७) अनेक वस्तू एकत्रित करणे किंवा जमविणे ९) राज्यासंबंधीचे प्रश्न किंवा गुप्त मसलत १०) गेलेला; भूत; अवस्था; दशा १२) निषध देशाचा राजा; दमयंतीचा पती १३) आशीर्वाद; नवरा मुलगा १४) बंधू १६) किनारा; तीर; काठ १७) तापलेले; तप्त; लसलशीत २१) पिवळा २२) ढगांचा आवाज २३) शशी; चंद्र; एक वनस्पती

**उभे शब्द :-** १) एक निरुपयोगी व हानिकारक तण २) मृत्युदेव ३) एक पक्षी; राघू; पोपट; कीर ४) दृष्टादृष्ट ५) पदार्थाचा उडालेला तुकडा ६) तांड्यावर वस्ती करून राहणारा एक समाज ८) टप्पा; एका दिवसात आक्रमिलेला रस्ता ११) गोणपाट; तादूक १४) आपला देश १५) झोपताना डोक्याखाली घेतात ती मऊ वस्तू १८) मैदा; सोजी १९) फार बारीक व मऊ २०) गुंग; मग्न; लीन; रत; रममाण

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** आयुष्य चांगल्या वाईट अनुभवाची शाळा आहे, जिथे प्रत्येक अनुभव देतो एक शिकवण.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### जेवणानंतर पान का खाल्ले जाते?

भारत हा असा देश आहे जिथे लोक विविध प्रकारच्या जेवणाचा आनंद घेतात. दुपारचे जेवण असो वा रात्रीचे जेवण, मेनूमध्ये नेहमीच तिखट ते गोड पदार्थांचा समावेश असतो. तथापि, लोक मांसाहारी पदार्थांचाही समावेश करतात आणि जेवणासोबत लस्सी घेतात. इतकेच नाही, तर जेवणानंतर मुखशुद्धी देखील दिली जाते. काही लोकांना पान खायलाही आवडते. तथापि, पान खाण्याची ही परंपरा नवीन नाही; ती प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. लग्न असो, सण असो किंवा पाहुण्यांचे आदरातिथ्य असो, जेवणानंतर पान देणे हा एक विशेष विधी मानला जातो. कारण त्यामुळे केवळ चवच वाढत नाही, तर त्याचे आरोग्यदायी फायदेही आहे. त्यामुळे पचनक्रिया सुधारते, तोंडाची दुर्गंधी दूर होते आणि शरीराला आराम मिळतो. तथापि, पान खाण्यामागील विज्ञान समजून घेणे महत्त्वाचे आहे.

पान खाण्याचे आयुर्वेदिक महत्त्व

आयुर्वेदात, पान केवळ मुखशुद्धीसाठीच नाही, तर ते औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण मानले जाते. संस्कृतमध्ये 'नागवेली' म्हणून ओळखले जाणारे हे पान पचनक्रिया सुधारण्यास आणि शरीरातील दोषांचे संतुलन राखण्यास मदत करते.

पान खाण्याचे फायदे

पचनसंस्था - पान खाल्ल्याने पोटाला खूप आराम मिळतो. त्यामुळे पचनक्रिया सुधारते आणि त्यात वापरलेले बडीशेप, वेलची आणि लवंग यांसारखे घटक देखील खूप फायदेशीर आहेत. यामुळे अन्न सहज पचण्यास मदत होते आणि गॅस किंवा अपचन कमी होते.

तोंडाची दुर्गंधी- जेवणानंतर तोंडाची दुर्गंधी दूर करण्यासही हे मदत करते. त्यात असलेले पोषक घटक जीवाणू कमी करतात. म्हणूनच प्राचीन काळी लोक टूथपेस्टऐवजी विड्याच्या पानाचा वापर करत असत.

शरीर उबदार ठेवणे- आयुर्वेदानुसार, विड्याच्या पानाचा उष्णता देणारा गुणधर्म आहे. ते खाल्ल्याने शरीरात सौम्य उष्णता निर्माण होते, जी विशेषतः हिवाळ्यात फायदेशीर ठरते. यामुळे रक्ताभिसरणही सुधारते.

मानसिक ताण कमी करणे- विड्याच्या पानातील काही नैसर्गिक घटक मन शांत करतात आणि मनःस्थिती सुधारतात. त्यामुळे जेवणानंतर विड्याचे पान खाल्ल्याने आराम वाटतो. दात आणि हिरड्यांसाठी फायदे- लवंग, वेलची आणि कात यांसारखे घटक दात आणि हिरड्या मजबूत करण्यास मदत करतात. ते जीवाणू कमी करतात आणि तोंडाचे आरोग्य राखतात.

### हुशारी

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एके दिवशी एका राजाने सर्व ब्राह्मणांना आपल्या दरबारात बोलावले आणि म्हणाला, मला एक भव्य परीक्षा घ्यायची आहे. जो कोणी ही परीक्षा उत्तीर्ण होईल त्याला भव्य बक्षीस मिळेल. सर्व ब्राह्मणांना राजेशाही बक्षीसाची अपेक्षा होती, परंतु राजाची त्यांची परीक्षा घेण्याची पद्धत खूपच विचित्र होती. त्याने सर्व ब्राह्मणांना असे काहीतरी सांगण्यास सांगितले जे त्याला पूर्णपणे समजेल आणि त्याला त्रास देणार नाही.

एका हुशार ब्राह्मणाने त्याबद्दल विचार केला आणि मग राजाकडे गेला. तो म्हणाला, महाराज, मी तुम्हाला एक अशी गोष्ट सांगेन जी तुम्हाला समजणे कठीण होणार नाही आणि ती तुम्हाला त्रास देणार नाही. ब्राह्मणाने राजाला एक साधी गोष्ट सांगितली, कोणत्याही गुंतागुंतीशिवाय. राजाला कथा समजली आणि तो खूश झाला. हुशार ब्राह्मणाने राजाला समजावून सांगितले की कधीही आपल्या अधिकाराचा गैरवापर करू नये आणि शहाणपणाने निर्णय घ्यावेत. राजाने ब्राह्मणाचे म्हणणे ऐकले आणि त्याला जाणवले की त्याच्या आळशीपणामुळे तो राज्याच्या भल्यासाठी काहीही करत नाही. त्यानंतर, राजाने आपल्या सवयी बदलल्या आणि आपल्या राज्याचे योग्यरित्या राज्य करू लागला.

तात्पर्य : आपण आपले निर्णय विचारपूर्वक घेतो तेव्हा खरे शहाणपण येते.

## जीवन का अमृत (भाग १)



ये वृत्तांत उसको इस बात की उम्मीद बँधाते हैं कि वह एक सच्चे सत्गुरु की छत्रछाया में, उच्चतर आंतरिक मंडलों की चढ़ाई कर सकता है। अतः उनकी असली कीमत उन अन्य लोगों के कथनों से ज्यादा नहीं है, जो अंतर में गए और जिनके कथन अन्य पवित्र ग्रंथों में दिए गए हैं।

५. सच्चा शिष्य वह है, जो सत्गुरु की इच्छा और खुशी में अटल विश्वास रखता है और उसको पूरी तरह समर्पित है

पूर्ण समर्पण के द्वारा, मन की सारी बक-बक समाप्त हो जाती है और तब कोई इच्छा या लालसा नहीं रहती ।

इंद्रियों के घाट की जिंदगी का तीव्र कोलाहल, शांति और सौहार्द में बदल जाता है, जो कि सच्चे त्याग और समर्पण से मिलते हैं।

### शांत क्षण

ऐसे शांत क्षणों में ही आध्यात्मिक चेतनता का उदय होता है।

६. आप ठीक से समझ लें कि आप निरोल प्रभु (अनामी) तक जाने वाले रास्ते पर डाल दिए गए हैं, जिसे स्वामी शिवदयाल सिंह जी, बाबा जैमल सिंह जी और बाबा सावन सिंह जी ने सिखाया था और जो कि सबसे प्राकृतिक और सरल रास्ता है, क्योंकि इस विधि में प्राणों को नहीं छेड़ा जाता। सर्वोच्च कोटि के सतगुरुओं के अनुसार, इससे ऊपर कोई और सत्य नहीं है। स्वामी शिवदयाल सिंह जी ने कहा था कि सत्गुरु का काम आपको सतनाम तक ले जाना है और तब सतनाम आपको अनामी तक ले जाकर उसमें लीन कर देता है, जिसे कि राय सालिगराम जी ने राधा-स्वामी के नाम से पुकारा और स्वामी शिव दयाल सिंह जी ने इसे स्वीकार कर लिया। इसे गुरु नानक और अन्य गुरुओं ने 'स्वामी, अनामी, महादयाल या निराला' के नामों से पुकारा है। 'राधा स्वामी' किसी नई वस्तु का नाम नहीं है, सिर्फ उस अनामी का एक और नाम है। अगर कोई कहता है कि इसका अर्थ कुछ और है, तो उसे शायद पूरे तथ्यों का पता नहीं है । आप निश्चित रहें कि हम एक ही परम पिता या सर्वोच्च सच्चाई के बच्चे हैं, जिसे संतों-महात्माओं ने कई नामों से पुकारा है। वे सभी भाई-बहन, जिन्हें सत्गुरु का कोई भी कार्य सौंपा गया है, धन्य हैं। वे सौभाग्यशाली सेवादार हैं। पर उन्हें भारी जिम्मेवारी निभानी है। उनके कृत्य सत्गुरु के भले नाम पर अपनी छवि छोड़ जाते हैं। अतः उन्हें अवश्य ही, स्नेही, सहनशील और सहयोगी होना चाहिए; उनमें मानवता की निष्काम सेवा करने की भावना होनी चाहिए तथा उन्हें भजन-सिमरन में नियमित होना चाहिए। दयालु और महान कार्यों की अपनी कीमत है और सिर पर

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : मद्यपान सोडण्याची माझी इच्छा नव्हती का? शिवानीदीदी: वरवर तुम्हाला बदल करायची इच्छा होती पण तुमचं अंतर्मन त्यासाठी तयार नव्हतं. सुरेश ओबेरॉय : मद्यपान सुटावं म्हणून मी दर्ग्यांत आणि मंदिरांत गेलो, अनेक संतांकडे मदत मागितली. शिवानीदीदी : तुम्हाला असं वाटलं की ते तुम्हाला आशीर्वाद देतील आणि एखादी जादू होईल पण तसं झालं नाही. इतर लोक आपल्याला सकारात्मक ऊर्जा देऊ शकतात पण बदल हा आपला आपल्यालाच करावा लागतो. भलेही इतरांनी आशीर्वाद दिले तरी जोवर आपण स्वतः स्वतःला आशीर्वाद देत नाही तोवर

आपण स्वतःत बदल घडवून आणू शकत नाही. याउलट, आपल्या आजूबाजूच्या सगळ्यांनी, तू हे करू शकत नाही, असं आपल्याला सांगितलं तरीही आपण ते मिळवू शकतो कारण तशी आपली इच्छा असते. तेव्हा आपलं कोणाबरोबरचं नातं म हत्त्वाचं आहे?

### विश्वास

सुरेश ओबेरॉय : स्वतःबरोबरचं. कधीकधी आपला एखाद्या व्यक्तीवर विश्वास असतो आणि आपण असा विचार करतो की, ती व्यक्ती हे म्हणाली आहे म्हणजे ती गोष्ट नक्कीच घडेल.

शिवानीदीदी : हे तात्कालिक आहे. तुमचा एखाद्यावर विश्वास आहे तेव्हा तुम्ही असा विचार करू शकता की, ती व्यक्ती म्हणाली आहे म्हणजे आता माझा संस्कार बदलेल. पण हा विचार तुमच्या मनात काही दिवसच राहील. त्यानंतर, तुम्हाला स्वतःबरोबरच राहायचं आहे. म्हणूनच अध्यात्म आपल्याला स्वतःला आशीर्वाद द्यायला शिकवतं. जेव्हा आपल्याला स्वतःमध्ये काही बदल करावेसे वाटतील तेव्हा आपण स्वतःवर टीका करू नये. फक्त बदल करायची तीव्र इच्छा असायला हवी. असं करायची शक्ती आपल्यात आधीपासूनच आहे. हा बदल केल्याने होणाऱ्या फायद्यांबद्दल किंवा लाभांबद्दल स्वतःला सांगून आपण बदल करायची इच्छा निर्माण करू शकतो. शांत व्हा... माझ्यातील असा संस्कार जो मला आणि इतरांना दुःख आणि वेदना देतो तो मला ओळखायचा आहे... हा संस्कार माझं नुकसान करतो आहे... मला बदल करायची गरज आहे... आता बदल करायची वेळ आली आहे... जर आज मी हा संस्कार बदलला... तर माझ्या आयुष्यात काय बदल होतील याचं मी परीक्षण करेन... या नवीन संस्काराबरोबर मी स्वतःचं मानसिक चित्रण करतो... ह्या बदलामुळे माझ्या जीवनातील लाभ मला दिसत आहेत... माझ्यामध्ये बदल घडवण्याची इच्छा आणि संकल्प दोन्हीही आहेत... ह्या बदलामुळे होणाऱ्या फायद्यांचं मला संपूर्ण आकलन आहे... मी एक निर्णय घेत आहे, मी, एक शक्तिशाली आत्मा, भूतकाळातील सगळ्या गोष्टींना पूर्णविराम देईन... ह्या नवीन संस्कारासोबत जगायला मी तयार आहे... ओम शांती! (क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

नवरा : जर तुझ्यात काही प्रतिभा असेल तर,
तर त्या कौशल्याला उत्पन्नाचे साधन बनव...
बायको : म्हणजे..., आता मला तुमच्याशी भांडण्यासाठी
सुद्धा पैसेही मिळतील काय?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* साऊथ आशिया बास्केटबॉल असोसिएशन महिला चॅम्पियनशीप २०१९ चे विजेतेपद कोणी पटकावले आहे? - भारत

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### डाळींब

अति ताप आल्यावर पथ्यकर आहार म्हणून डाळिंब किंवा डाळिंबाचा रस द्यावा. तापामुळे शरीरामध्ये वाढलेली उष्णता गोड डाळिंबाने कमी होते व ताप नाहीसा होतो. चिरतारुण्य टिकविण्यासाठी रोज एका डाळिंबाचे सेवन करावे. शरीर मजबूत, काटक व सुंदर बनविण्यासाठी डाळिंब रस व आवळा रस एकत्र करून त्यामध्ये खडीसाखर घालावी व आठ दिवस उन्हात ठेवावे. तयार झालेले सरबत रोज एक कपभर प्यावे. अपचन, आम्लपित्त, ताप या कारणांनी जर तोंडाला दुर्गंधी येत असेल, तर डाळिंबाचे दाणे चावून खावे. यामुळे तोंड स्वच्छ होऊन दुर्गंधी नाहीशी होते व तोंडाला रुची प्राप्त होते. घसा दुखणे, तोंड येणे हे आजार झाले असतील, तर डाळिंबाच्या सालीच्या काढ्याने गुळण्या कराव्या. लाल रंगाचे दाणे असलेले गोड डाळिंब हे रक्तवर्धक आणि शक्तिवर्धक असल्याने ज्यांना रक्ताची कमतरता (निमिया) आहे, त्यांनी रोज एक डाळिंब सेवन करावे.

अपचन, पोटात गॅस धरणे, शौचास साफ न होणे ही लक्षणे असतील, तर रोज एक आंबट-गोड डाळिंब खावे. यामुळे जाठराग्नी प्रदीप्त होऊन अन्न पचते व बियांमधील चोथ्यामुळे पोट साफ होण्यास मदत होते. डाळिंबाची साल, फुले हे आतड्यांमधील कृमींवर प्रभावशाली आहे. पोटात होणारे चपटे कृमी, लांब जंत हे डाळिंबांच्या सालीमध्ये असणाऱ्या अल्क गुणाने मरतात. याचा काढा सलग तीन दिवस एक ग्लासभर दिवसातून तीन वेळा द्यावा. याने सर्व प्रकारचे जंत, कृमी पडून जातात. १०) स्त्रियांमध्ये होणाऱ्या श्वेत व रक्त प्रदरावर डाळिंबाची साल गुणकारी ठरते. ही साल तांदळाच्या धुवणात वाटून द्यावी. डाळिंबाचा रस अतिसार, मुरडा, संग्रहणी, आम्लपित्त, पंडुरोग (ॲनिमिया), जुनाट ताप, खोकला इत्यादी आजारांवर गुणकारी आहे.

मूळव्याधीमध्ये जर रक्त पडत असेल, तर डाळिंबाच्या सालीचे चूर्ण नागकेशरमध्ये घालून द्यावे. यामुळे रक्त पडण्याचे बंद होते, तसेच अशक्तपणा आला असेल, तर डाळिंबाचा रस प्राशन करावा. बाराही महिने डाळिंबाचे औषधी गुणधर्म उपयोगात आणण्यासाठी डाळिंबापासून बनवलेल्या दाडीमावलेह, दाडीमादीघृत इत्यादी औषधांचा वापर करावा.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# अंधश्रद्धा, भोंदूगिरीविरोधात राज्यव्यापी मोहीम राबवा; कडक कारवाई करावी

## ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्ष स्वाती सिरसुल यांचे निवेदन



नगर – महाराष्ट्रात अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि त्यातून होणाऱ्या महिला व अल्पवयीन मुलींच्या शोषणाच्या घटना वाढत असून, अशा सर्व प्रकारांवर शासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्ष सौ. स्वाती सिरसुल यांनी केली आहे.

गेल्या महिन्याभरात राज्यभर गाजलेल्या भोंदू कॅप्टन अशोक खरात प्रकरणामुळे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. विशेषतः महिलांवरील लैंगिक शोषण, अत्याचार आणि फसवणुकीच्या घटनांमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणातून जनतेला वास्तव समजले असले, तरी अशाच प्रकारे काळी जादू, चमत्कार, भविष्यवाणी, अंकज्योतिष किंवा 'देवाचे अवतार' असल्याचा दावा करून लोकांची फसवणूक करणारे अनेक भोंदूबाबा आजही सक्रिय असल्याचा आरोप सिरसुल यांनी केला.

त्यांनी पुढे म्हटले की, काही भोंदूंचे राजकीय नेते, मंत्री, वरिष्ठ अधिकारी तसेच समाजातील प्रभावशाली व्यक्तींशी संबंध असल्यामुळे त्यांचा दबदबा वाढला. त्यामुळे त्यांच्या विरोधातील लैंगिक शोषण, अत्याचार, विनयभंग आणि आर्थिक घोटाळ्यांची माहिती असूनही पीडितांनी तक्रार करण्यास धजावले नाही. राजकीय पाठबळामुळे न्याय मिळणार नाही, या भीतीमुळे अनेक महिला पुढे आल्या नाहीत, हे वास्तव आता उघड झाले आहे. काही उच्चपदस्थ अधिकारी व नेत्यांचे अशा व्यक्तींसोबतचे फोटो समोर आल्याने सामान्य जनतेतही संताप व्यक्त होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

धर्मांतर, ड्रग्स प्रकरणे, अश्लील व्हिडिओद्वारे ब्लॅकमेलिंग आणि महिलांवरील वाढते अत्याचार या गंभीर बाबींवर नियंत्रणासाठी कडक कायदे करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे, असेही सिरसुल यांनी सांगितले. नाशिकमधील प्रकरण, मुंबईतील गोरेगाव ड्रग्स प्रकरणातील तरुणांचे मृत्यू, अमरावतीतील परतवाडा येथील महिलांचे शोषण, तसेच संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथील भोंदूगिरीचे प्रकार यामुळे राज्यभर चिंता वाढली आहे. या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर तपास यंत्रणांची भूमिका काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

याच अनुषंगाने, आजच्या डिजिटल युगात नाशिकसारख्या धार्मिक व पवित्र क्षेत्रात असलेल्या आयटी पार्कमध्येही महिलांची सुरक्षितता धोक्यात असल्याचे समोर आले आहे. टीसीएस कंपनीच्या आयटी क्षेत्रात कार्यरत असलेल्या सॉफ्टवेअर व आयटी इंजिनिअर सारख्या उच्चशिक्षित महिलांचे धर्मांतर करून त्यांचे वारंवार लैंगिक शोषण झाल्याच्या घटना समोर आल्या असून, कॉर्पोरेट क्षेत्रातही महिला सुरक्षित नाहीत, ही अत्यंत गंभीर व खेदजनक बाब असल्याचे सिरसुल यांनी नमूद केले.

तसेच अमरावती जिल्ह्यातील परतवाडा परिसरातील धक्कादायक प्रकारात काही १९ ते २० वर्षांच्या तरुणांनी शेकडो महिलांचे अश्लील चित्रण करून त्यांचे लैंगिक शोषण केले. संबंधित महिलांची बदनामी करण्यासाठी इंस्टाग्राम व फेसबुकसारख्या सोशल मीडियाचा वापर करत त्यांना ब्लॅकमेल करण्यात आले. एवढेच नव्हे तर या विकृत कृत्यांची स्पर्धा करून 'कोण अधिक शोषण करतो' यावरून सार्वजनिक ठिकाणी सेलिब्रेशन केल्याचेही उघड झाले आहे. या घटनांमुळे समाजात अत्यंत घृणास्पद मानसिकता वाढत असल्याचे दिसून येते, असेही त्यांनी सांगितले.

मोबाईल आणि सोशल मीडियाचा गैरवापरही या समस्येला खतपाणी घालत असल्याचे त्यांनी नमूद केले. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सॲप यांसारख्या माध्यमांवरून अश्लील व आक्षेपार्ह सामग्री प्रसारित होऊन अल्पवयीन मुलांमध्ये चुकीचे आकर्षण निर्माण होत आहे. यामुळे ड्रग्स सेवन, लैंगिक अत्याचार आणि ब्लॅकमेलिंगच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने अशा प्लॅटफॉर्मवर नियंत्रण आणावे किंवा गरज पडल्यास कठोर निर्बंध लावावेत, अशी मागणी त्यांनी केली.

भोंदूगिरी, मंत्र-तंत्र, काळी जादू, खोटी भविष्यवाणी, धर्मांतर आणि महिला शोषणाशी संबंधित प्रकरणांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींवर लक्ष ठेवून त्यांना नियंत्रणात आणणे आवश्यक आहे. यासाठी अशा प्रकारच्या व्यक्तींची नोंदणी, परवाना व्यवस्था किंवा विशेष कायदेशीर चौकट तयार करता येईल का, याचा शासनाने विचार करावा, असेही त्यांनी सुचविले.

तसेच महिलांनी आणि अल्पवयीन मुलींनी सतर्क राहून आपल्या आसपास अशा घटना घडत असल्यास तात्काळ पोलिसांकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहनही सिरसुल यांनी केले. भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना आखून सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्याची गरज असल्याचे त्यांनी शेवटी स्पष्ट केले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## कर्मयोग कर्मसंन्यास

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलनः दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

कर्म आणि ते घडविणारा कर्ता यांचे चार प्रकारात वर्गीकरण करता येते. पहिला वर्ग म्हणजे क्रियाशून्य किंवा कर्मरहित, कर्मत्यागी होय. दुसरा वर्ग म्हणजे कर्ता होय. तिसरा वर्ग कर्मयोगी तर चौथा 'कर्मसंन्यासी' होय. व्यवहारात अशी माणसे आढळतात की जी अद्वितीय कर्मे सोडाच पण नित्याचे जीव जगताना आपल्या वाट्याला आलेली विहित कर्मेही करीत नाहीत पण कर्माच्या फळाची मात्र अपेक्षा धरतात. 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' अशी त्यांची भूमिका असते.

जीवनामध्ये जर कर्म पेरले तरच समृद्धीची फळे येतील. कर्म तर करायचे नाही आणि कर्मफळाची अपेक्षा तर धरायची हा जो वर्ग आहे तोच कर्मत्यागी किंवा क्रियाशून्य वर्ग होय. वैयक्तिक आणि सामाजिक प्रगतीची कोणतीही अपेक्षा अशा वर्गाकडून करणे चुकीचे ठरते. दुसरा वर्ग हा निष्ठेने कर्मही करतो आणि कर्माच्या फळाची आशाही धरतो. कर्तृत्वाचा म्हणजे 'हे कार्य मी केले आहे' या भावनेचा त्याला अहंकारही असतो. याच वर्गाला 'कर्ता' म्हणतात. व्यवहारातील अनेक कर्मे अशा वर्गाकडून घडली जातात. तिसरा वर्ग म्हणजे 'कर्मयोगी' होय. तो नित्यकर्म करतो परंतु कर्मफलाची आशा करीत नाही. तो निष्काम कर्मयोगी होय. इथे कर्माचे सातत्य असते पण कर्मफलाची आशा नसते तर चौथा वर्ग म्हणजे 'कर्मसंन्यासी', जो नित्य कर्मात रमतो, फळाची आशाही करीत नाही आणि 'या कर्माचा मीच कर्ता आहे' ही कर्तृत्वाची भावना म्हणजेच कर्तृत्वाचा अहंकारही मावळलेला असतो. नित्य कर्म करुनही फलाशेमध्ये आणि कर्मबंधात न अडकणारा तोच कर्मसंन्यासी होय. 'संन्यासः कर्मयोग!'

या गीतेच्या पाचव्या अध्यायातील श्लोकावर भाष्य करताना ज्ञानेश्वर माउली सांगतात अर्जुना, सखोल विचार केला असता कर्मयोग आणि कर्मत्याग हे दोन्ही मोक्षदायकच आहेत परंतु त्यातही कर्मयोग हा अधिक सोपा व सुलभ आहे. माउली दृष्टांत देतात,

तरी जाणां नेणा सकळां
हा कर्मयोगु कीर प्रांजळा
जैसी नाव स्त्रिया – बाळा ।
तोयतरणी ।। ज्ञाने. ५११६

पाण्यातून तरून जायचे आहे. ज्याला पोहता येते तो सहजपणे पैलतीरावर जाईल पण ज्यांना पोहता येत नाही अशा स्त्रिया आणि बालकांना नावेचा आधार घेऊनच पैलतीरावर जावे लागते. त्याप्रमाणे कर्मयोग हा सर्वांना तरून जाण्याचे नावेसारखे सोपे साधन आहे.

– किशोर गांधी

# बालविवाह रोखण्यासाठी विपला फाउंडेशनने अक्षय तृतीयेनिमित्त पाळला 'सतर्कता दिवस'

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यात बालहक्कांचे संरक्षण आणि बालविवाह रोखण्यासाठी कार्य करणाऱ्या विपला फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने, बालविवाहांना आळा घालण्यासाठी अक्षय तृतीयेच्या निमित्ताने 'सतर्कता दिवस' पाळला. बालविवाह प्रतिबंधक अधिकारी (सीएमपीओ) आणि अंगणवाडी शिक्षिका, पर्यवेक्षिका, आशा स्वयंसेविकांनी देखील या मोहिमेला पाठिंबा दर्शवला आणि संपूर्ण जिल्ह्यात बालविवाह रोखण्यासाठी आपली वचनबद्धता व्यक्त केली.

जिल्हा प्रशासन, पंचायती, शाळा आणि धर्मगुरूंच्या सहकार्याने, जिल्ह्याला बालविवाह मुक्त करण्याच्या उद्देशाने विपला फाउंडेशन ही संस्था शाळा, पंचायती आणि गावांमध्ये बालविवाहाविरुद्ध जनजागृती मोहीम राबवत आहे. या संस्थेने जिल्ह्यातील हजारो लोकांना बालविवाह न करण्याची शपथ दिली आहे. विशेषत: अक्षय तृतीया आणि विविध धर्मामधील लग्नसराईच्या काळासारख्या प्रसंगी, प्रशासन आणि सरकारच्या पाठिंब्याने ही संस्था विशेष प्रतिबंधात्मक मोहिमा राबवत आहे. विपला फाउंडेशन ही 'जस्ट राइट्स फॉर चिल्डन' ची भागीदार संस्था आहे, जे बालहक्कांचे संरक्षण आणि संवर्धनासाठी काम करणाऱ्या २५० हून अधिक स्वयंसेवी संस्थांचे देशातील सर्वात मोठे जाळे आहे.

जिल्ह्यातील बालविवाह विरोधी मोहिमेच्या आतापर्यंतच्या यशावर समाधान व्यक्त करताना, विपला फाउंडेशनचे संचालक श्रीमती ज्योती नाळे म्हणाले, बालविवाह हा एक घृणास्पद गुन्हा आहे आणि अक्षय तृतीयेचा शुभ मुहर्त किंवा इतर कोणत्याही धार्मिक कारणाखाली त्याचे समर्थन केले जाऊ शकत नाही. प्रशासन आणि सामाजिक संस्थांच्या सतर्कतेमुळे या दिवशी होणाऱ्या बालविवाहांच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली आहे, परंतु ही प्रथा पूर्णपणे मुळापासून नष्ट करण्याची गरज आहे.



अहिल्यानगर जिल्ह्यात बालहक्कांचे संरक्षण आणि बालविवाह रोखण्यासाठी कार्य करणाऱ्या विपला फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने, बालविवाहांना आळा घालण्यासाठी अक्षय तृतीयेच्या निमित्ताने 'सतर्कता दिवस' पाळला.

ते पुढे म्हणाले की, काही वर्षांपूर्वीपर्यंत लोकांना याची कल्पनाही नव्हती की बालविवाह प्रतिबंधक कायदा' (पीसीएमए), २००६ अंतर्गत बालविवाह हा एक दंडनीय अपराध आहे. अशा विवाहांमध्ये कोणत्याही प्रकारचे सहकार्य किंवा सेवा पुरवल्यास दोन वर्षांपर्यंतचा कारावास, किंवा दंड अथवा दोन्ही शिक्षा एकत्र होऊ शकतात. यात केवळ वऱ्हाडी मंडळी आणि मुलीचे कुटुंबीयच नाही, तर केटरर्स, डेकोरेटर्स, हलवाई, फुलविक्रेते, बँड पथक, मंगल कार्यालय मालक आणि अगदी लग्न लावून देणारे पुजारी किंवा मौलवी यांचाही समावेश होतो. हे सर्वजण या गुन्ह्यात सामील असल्याचे मानले जाते आणि तेदेखील शिक्षा तसेच दंडास पात्र आहेत. मात्र तळागाळात राबवलेल्या सखोल जनजागृती मोहिमांमुळे जिल्ह्यात आता जागरूकता वाढली असून परिस्थिती बदलली आहे. बालविवाहाच्या घटनांची लोक आता स्वतःहून माहिती देत आहेत आणि प्रशासन देखील ते रोखण्यासाठी त्वरित पावले उचलत आहे. हा एक महत्त्वपूर्ण बदल असून, २०३० पूर्वीच या जिल्ह्याला बालविवाहमुक्त करण्याचे उद्दिष्ट पूर्ण होईल, असा आम्हाला ठाम विश्वास आहे.

'जस्ट राइट्स फॉर चिल्डून' आपल्या २५० हून अधिक भागीदार संस्थांसह देशातील बालविवाहाचे प्रमाण अजूनही जास्त असणाऱ्या ४५० पेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये या गुन्ह्याविरुद्ध मोहीम राबवत आहे. या जाळ्याने आतापर्यंत पाच लाखांहून अधिक बालविवाह रोखले आहेत.





माहेश्वरी समाजातील ७५ व त्यापेक्षा जास्त वय असलेल्या ४० महिलांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला. शेजारील छायाचित्रात उपस्थित असलेल्या ज्येष्ठ महिला.

# माहेश्वरी मंडळाचा अनोखा सोहळा, ज्येष्ठ महिलांचा भावपूर्ण सत्कार

नगर – प्रेमराज सारडा कॉलेजच्या बहुउद्देशीय हॉलमध्ये १२ एप्रिल रोजी एक अनोखा सोहळा झाला. माहेश्वरी समाजातील ७५ व त्यापेक्षा जास्त वय असलेल्या ४० महिलांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला. मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा सुनंदा सोमाणी, वर्तमान अध्यक्षा स्नेहलता सोमाणी, प्रमुख अतिथी ललिता मालपाणी, कार्यक्रमाच्या अध्यक्षा जिल्हाध्यक्षा अनुराधा राठी, बसंतीबाई काकानी यांच्या उपस्थितीत व प्रकल्प प्रमुख स्मिता सारडा, निर्मला बंग यांच्या हस्ते दीप प्रज्वलन होऊन कार्यक्रमास प्रारंभ झाला.

कार्यक्रमांच्या प्रारंभी सर्व ज्येष्ठ महिलांचा फुलांची उधळण करत स्वागत करण्यात आलं. त्यानंतर च्या कार्यक्रमात महिलांनी वेलकम ड्रिंक, नाश्ता, चहा, भोजन यांचा आस्वाद घेतला. सुंदर भेटवस्तू देऊन त्यांचे आशिर्वाद घेतले गेले. गाण्यावर आधारित छान छान रिल्स बनवण्यात आल्या. या वयात ही सर्व महिला उत्साहाने कोरिओग्राफर ने दाखवल्याप्रमाणे हुबेहूब कृती आणि अभिनय करत होत्या. रील बनवत असताना महिलांचा आनंद खरोखरच बघण्यासारखा होता. किशोरी बिहाणी, प्रतिभा बजाज, पुष्पा अट्टल, समता दमाणी यांनी रील बनविण्यासाठी परिश्रम घेतले.

श्यामा मंत्री यांनी बहारदार सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी ऊषा बजाज, सुषमा काकाणी, सुनिता सोमाणी, वैशाली मालपाणी, शशिकला सोनी, अलका नावंदर, सविता बंग, शोभा काकाणी, अनुराधा काकाणी, सुनिता सिकची, सरला स्वामी यांनी परिश्रम घेतले.

ललिता मालपाणी यांनी आपली संस्कृती, परंपरा यांचा मान राखत नवीन पिढीबरोबर आपणही बदलले पाहिजे असा सल्ला आपल्या भाषणात दिला.

जिल्हाध्यक्ष अनुराधा राठी यांनी संघटन चे महत्व पटवून दिले.

मंडळाच्या आतापर्यंत च्या वाटचालीबद्दल सौ.सुनंदा सोमाणी यांनी तर प्रोजेक्ट बद्दल सौ.स्मिता सारडा यांनी माहीती दिली. आभार प्रदर्शन सौ.निर्मला बंग यांनी केले.

# अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीचा निकालाची उज्वल परंपरा कायम

नगर – शैक्षणिक गुणवत्तेचा नवा मानदंड प्रस्थापित करत अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी चा यंदा १००टक्के निकालाची दैदिप्यमान परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल विद्यापीठामार्फत मार्फत घेण्यात आलेल्या द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष व अंतिम वर्ष परीक्षांमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत संस्थेचा नावलौकिक अधिकच उंचावला आहे.

प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांनी ही माहिती देतांना विद्यार्थ्यौच्या परिश्रमांचे तसेच प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचे कौतुक केले, द्वितीय वर्ष मोनिका तावरे (८.९२) प्रथम, मयुरी कर्डिले(८.५८) द्वितीय, तर वैष्णवी सोनवणे, अभिजीत शेळके (८.४२) यांनी तृतीय क्रमांक मिळवला.

तृतीय वर्ष सेमिस्टर ५ मध्ये आकाश वायकर (८.२३) प्रथम, वैष्णवी गाडे, दिशा लांडे, वृषाली कोळपे (८.०८) द्वितीय तर गौरी ससाणे (८.००) तृतीय क्रमांक मिळविला.

अंतिम वर्ष (सेमिस्टर ७) मध्ये अर्चना गारुडकर, स्वप्नील कातखडे, (८.७५) प्रथम, गौरी चौधरी, नाविन्य मुनोत, मयुरी टेकाडे (८.५८) यांनी संयुक्त द्वितीय, आर्या शालिग्राम, सायली गांधी, पुनम उगले, विद्या मेत्रे, नुसरत शेख, किरण डमाळे, गायत्री मुळे, युवराज्ञी भराट(८.४२) तृतीय क्रमांक मिळवला आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे कॉलेज चे प्राचार्य डॉ. योगेश बाफना, उपप्राचार्या वर्षाराणी आव्हाड, प्रा.जितेश बत्रा, पीयुष जंगम, सुधीर गर्जे, तृप्ती शिंदे, कांचन गलगते, स्नेहा कणसे, मिलिंद क्षीरसागर, नीता येणारे, योगेश पंडित, अपर्णा पंडित, अमोल बर्डे, अनिल गावडे, पल्लवी गुगळे, धनश्री गटने, स्वाती भुजबळ, अमृता कुलथे, वैशाली शिंदे, सोनी मिश्रा, बाळासाहेब भागवत, शारदा भागवत यांनी अभिनंदन केले.

# प्रतिकुलतेतही मनाची प्रसन्नता रहाणे हे सत्संगाचे फळ

## राधाकृष्ण महाराज यांचे प्रतिपादन



नगर – प्रतिकुलतेतही मनाची प्रसन्नता कायम रहाणे हे सत्संगाचे फळ होय. सत्संगाच्या प्रभावामुळे जीवनातील पवित्रता वाढत रहाते, असे प्रतिपादन राधाकृष्ण महाराज यांनी केले.

येथील रामनिवास सतीशचंद्र इंदाणी आणि इंदाणी परिवारातर्फे नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात ते बोलत होते.

राधाकृष्ण महाराज पुढे म्हणाले, सत्संगाने संत दर्शनापर्यंत पोहोचण्याचा मार्ग सुकर होतो. संत दर्शन झाले की संतांच्या हृदयातील भगवंताचे दर्शन घडते. ज्या घरात आई-वडिल रहातात तेच घर पवित्र असते. शेठजींच्या तिजोरीत सोन्या-चांदीची दागिने, पैसे, जमिनीची कागदपत्रे असतात पण भक्तांच्या मनाच्या तिजोरीत फक्त भगवान श्रीकृष्ण-पांडुरंग रहातात. कोणी पूजापाठ, जप, पोथी पठण, सत्संग, भजन, ध्यान करत असतील तर त्यात बाधा आणण्याचे पाप कदापीही करू नका. तीर्थ, धाम, मंदिरात गेल्यावर तेथे स्वच्छतेची सेवा करा. मंदिरांच्या स्वच्छतेचे महत्त्व पुराण ग्रंथात- शास्त्रात वर्णन केलेले आहे.

आपल्या घराण्याच्या परंपरा श्रध्देने जतन करताना त्यात आपला भावही असावा. ब्रह्ममुहूर्तावर उठावे. सकाळी घर उत्साहाने -प्रसन्नतेने भरून जावे. घराच्या अंगणात दररोज सडा-रांगोळी घालावी. झाडांना पाणी घालणे, चिमण्यांना दाणे टाकणे, गोग्रास देणे ही सत्कर्म नित्य नियमितपणे करावीत. साधू-संतांच्या सत्संगात रहावे. धर्म सांभाळावा. जो धर्माचरण करतो तोच खरा धर्मवीर.

ज्यांच्यावर भगवान श्रीकृष्ण प्रसन्न असतात त्यांनाच भारतभूमीवर जन्म घेण्याचे सौभाग्य प्राप्त होते. जन्मापासूनच भगवान श्रीकृष्णांच्या सेवेचा अधिकार प्राप्त होतो. भगवंतासोबत रहातो, असे आपले घर असावे. विठ्ठला कधी येशील माझ्या घरा....या गीताने वातावरण विठ्ठलमय झाले. भगवंताला भक्तांचे घर फार आवडते, असे सांगताना भगवंत भक्ता घरी गेल्याचे विविध दाखलेही राधाकृष्ण महाराजांनी श्रोत्यांच्या पुढ्यात ठेवले.

राधाकृष्ण महाराजांच्या अमृतवाणीमधून भागवत कथा श्रवण करण्यासाठी शहराच्या विविध भागातील भाविकांची अलोट गर्दी केली. महिलांची बालकांसह लक्षणीय उपस्थिती दिसून येत असून भाविक बालकांसाठी खाऊ वाटप करण्याचा आनंद घेऊ लागले आहेत. भजनाचा आनंद लुटताना उपस्थित सर्वच ठेका धरत भजनात तल्लीन होत असल्याचे पहावयास मिळते आहे.

# औसरकर मळा परिसरात 'आनंद चालीसा' पठणास प्रारंभ

## दर शनिवारी रात्री होणार आयोजन; श्रद्धाळूंना सहभागी होण्याचे आवाहन



नगर – सारसनगर परिसरातील औसरकर मळा येथे गुरु भक्तीची भावना वृद्धिंगत करण्यासाठी 'आनंद चालीसा' पठण या धार्मिक उपक्रमास उत्साहात प्रारंभ झाला आहे. प्रवर्तक गुरुदेव श्री कुंदनऋषि महाराज यांच्या प्रेरणेने प्रत्येक शनिवारी रात्री ९ वाजता हा उपक्रम नियमितपणे आयोजित करण्यात येणार आहे.


१८ एप्रिल रोजी महासतीजी श्री ज्ञानप्रभाजी 'सरल' महाराज यांच्या सान्निध्यात ओम कॉलनी, नानाजी नगर, सारसनगर येथील श्री अमृतलाल चोरडिया यांच्या निवासस्थानी 'आनंद चालीसा' पठण भावपूर्ण वातावरणात पार पडले.

याप्रसंगी सुनील गांधी, रितेश पारख, सुरेश मुनोत, हिरालाल गुंदेचा, दिपक कासवा, रोहित गांधी, पियुष भंडारी, नील गांधी, मोहित गांधी, सागर चोरडिया, आकाश चोरडिया, तुषार चोरडिया, दिपक गुगळे, प्रणय चोरडिया, प्रितेश लुंकड, अशोक छल्लाणी, कनकमल गांधी, किरण उकिर्डे, राजेंद्र नागपुरे आदी उपस्थित होते.

औसरकर मळा व परिसरात दर शनिवारी रात्री ९ ते ९.३० या वेळेत 'आनंद चालीसा' पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून, या उपक्रमात अधिकाधिक श्रद्धाळूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

कार्यक्रमास उपस्थित राहताना वेळेपूर्वी येऊन संपूर्ण पठणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

# साताळकर लोटस सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अहिल्यानगरचे पहिले रोबोटिक सर्जरी सेंटर सुरू




नगर – अहिल्यानगर शहरातील साताळकर लोटस रुग्णालयात अत्याधुनिक रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणाली सुरू होत शहराच्या आरोग्य क्षेत्रात नवा ठसा उमटवला आहे. रोबोटच्या सहाय्याने शस्त्रक्रिया करणारी सुविधा उपलब्ध करून देणारे हे शहरातील पहिलेच रुग्णालय ठरले असून, त्यामुळे जिल्ह्यातील रुग्णांना आता उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा स्थानिक पातळीवरच मिळणार आहे. अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर पार पडलेल्या या उद्घाटन सोहळ्यास भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, आमदार संग्राम जगताप, हरिभक्त परायण आदिनाथ महाराज शास्त्री, ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. साताळकर, तसेच रुग्णालयातील डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले की, अहिल्यानगरसारख्या शहरात रोबोटिक शस्त्रक्रिया प्रणाली सुरू होणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. यामुळे रुग्णांना मोठ्या शहरांमध्ये जाऊन उपचार घेण्याची गरज कमी होणार असून, वेळ, पैसा आणि श्रम यांची बचत होणार आहे. साताळकर लोटस रुग्णालयाने आधुनिक वैद्यकीय सेवेत नवा मापदंड निर्माण केला असून, ही सुविधा भविष्यातील आरोग्यसेवेचा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, ही सुविधा केवळ एका रुग्णालयापुरती मर्यादित नसून, संपूर्ण शहराच्या प्रगतीचे प्रतीक आहे. अशा अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे नागरिकांना दर्जेदार आणि सुरक्षित उपचार सेवा आपल्या शहरातच उपलब्ध होत आहे, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.

कार्यक्रमात डॉ. तनवर यांनी रोबोटिक शस्त्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देताना सांगितले की, रोबोट हा डॉक्टरचा पर्याय नसून एक अत्याधुनिक सहाय्यक आहे. डॉक्टरच्या नियंत्रणाखाली तो अधिक अचूक, स्थिर आणि सूक्ष्म हालचाली करतो, ज्यामुळे शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित आणि प्रभावी होते. यामुळे रुग्णांना कमी वेदना होतात, रक्तस्राव कमी होतो आणि रुग्ण लवकर बरे होतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी डॉ. सतीश सोनवणे यांना विशेष सन्मानाने गौरविण्यात आले. तसेच महिला बालकल्याण समितीच्या उपसभापती सानप मॅडम, नगरसेवक निखिल वारे, महेश लोंढे आणि नागरिक उपस्थित होते.



बालगृह प्रकल्पातील मुलांसोबत मिरावली दर्याचे मुजावर राजू जहागीरदार यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

## वंचित घटकातील चिमुकल्यांसोबत वाढदिवस साजरा

नगर – तपोवन रोड येथील बालगृह प्रकल्पातील मुलांसोबत मिरावली दर्याचे मुजावर राजू जहागीरदार यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. केक कापून आणि मुलांशी संवाद साधून साजरा करण्यात आला.

राजू जहागीरदार म्हणाले की, या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर मिळणारा आनंद हा कोणत्याही भौतिक सुखापेक्षा मोठा आहे. समाजातील प्रत्येक घटकाने अशा मुलांच्या पाठीशी उभे राहणे काळाची गरज आहे.

यावेळी सहारा फाउंडेशनचे अध्यक्ष अजीम राजे यांनी राजू जहागीरदार यांच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले, राजू जहागीरदार हे नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. वाढदिवस साजरा करण्याची ही पद्धत अत्यंत प्रेरणादायी असून, यामुळे सामाजिक एकात्मतेचा संदेश मिळतो.

मीरा फाउंडेशनचे अध्यक्ष इरफान जहागीरदार म्हणाले की, राजू जहागीरदार यांनी नेहमीच अशा उपक्रमांना प्राधान्य दिले आहे. आज या चिमुकल्यांसोबत वेळ घालवून आम्हाला जे समाधान मिळाले, ते शब्दांत व्यक्त करता येणार नाही. समाजातील गरजूंना आधार देणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे.

याप्रसंगी इरफान जहागीरदार, अजीम राजे, आमिर खान, सद्दाम शेख, अबरार शेख, शहाबाज शेख, नादिर शेख, शहबाज खान, आयनूल शेख, मोहम्मद हुसेन, लतीफ खान, सय्यद मोहसिन यांच्यासह मित्र परिवार आणि बालगृहातील कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी मुलांचे तोंड गोड करून त्यांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

# अहमदनगर मर्चंटस बँकेच्या दाळमंडई येथील विस्तारीत 'हेड ऑफीस अनेक्स'चा शुभारंभ

नगर – बँकिंग क्षेत्रात तीव्र स्पर्धा असल्याने ग्राहकांना जास्तीत जास्त अत्याधुनिक बँकिंग सोयी सुविधा देणे आवश्यक बनले आहे. अहमदनगर मर्चंटस को ऑप बँकेने बँकेचे संस्थापक चेअरमन हस्तीमल मुनोत यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाखाली दीर्घकाळ यशस्वी वाटचाल करताना नेहमीच अत्याधुनिक तंत्रज्ञान युक्त सेवा देण्यावर भर दिला आहे. आताच्या युगातील डिजिटल बँकिंग सुविधा मर्चंटस बँकेने कार्यान्वित केल्या आहेत. या जोडीलाच बँकेचा प्रशासकीय कारभार अधिक गतिमान व तत्पर करण्यासाठी हेड ऑफिसचा विस्तार करीत दाळमंडई येथे हेड ऑफिस अनेक्स उभारण्यात आले आहे. याठिकाणी विविध विभागांचे कामकाज प्रशस्त जागेत सुरू होईल. या विस्तारामुळे सभासद, खातेदार, कर्जदार, ठेवीदारांना अधिक चांगली सेवा निश्चित मिळेल असा विश्वास मर्चंटस बँकेचे संचालक किशोर गांधी यांनी व्यक्त केला.



अहमदनगर मर्चंटस को ऑप बँकेच्या दाळमंडई येथील विस्तारित हेड ऑफिस अनेक्सचा शुभारंभ अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर संचालक किशोर गांधी व संजय बोरा यांच्या हस्ते करण्यात आला.

अहमदनगर मर्चंटस को ऑप बँकेच्या दाळमंडई येथील विस्तारित हेड ऑफिस अनेक्सचा शुभारंभ अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर संचालक किशोर गांधी व संजय बोरा यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी व्हाईस चेअरमन अमित मुथा, संचालक सीए आयपी अजय मुथा, किशोर मुनोत, विजय कोथिंबीरे, सुभाष बायड, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य राजेश झंवर, सीईओ सुनील पुराणिक, जॉइंट सीईओ नितीन भंडारी, कर्मचारी प्रतिनिधी प्रसाद गांधी, जितेंद्र बोरा, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

संजय बोरा म्हणाले, सर्वोत्कृष्ट आर्थिक कारभार आणि विश्वासार्हता यासाठी मर्चंटस बँकेचा महाराष्ट्रात नावलौकिक आहे. तब्बल ५५ वर्षांच्या वाटचालीत बँकेने संस्थापक व विद्यमान चेअरमन हस्तीमल मुनोत यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय देदीप्यमान कामगिरी करत ठसा उमटविला आहे. सातत्याने नवनवीन सुविधा उपलब्ध करून देत बँकेने ग्राहकांना सर्वोत्तम सेवा दिली आहे. नवीन विस्तारित हेड ऑफिसमुळे अधिक जलद सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी आभार मानले.


## धर्मवीर संभाजी महाराजांच्या बलिदान दिनानिमित्त भवानी मराठा महिला ग्रुपच्यावतीने अभिवादन



नगर – छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त सावेडी येथील धर्मवीर चौक (प्रोफेसर चौक) येथे भवानी मराठा महिला ग्रुपतर्फे महाराजांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन ग्रुपच्या अध्यक्षा माधवी दांगट यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी प्रियांका म्हस्के, निलिमा म्हस्के, सुजाता पायमोडे, मनीषा भोसले, सुरेखाताई सांगळे, बापू ठाणगे, दत्ता वामन, प्रतिभा कदम, अमृता वाकळे, पूजा पवार, शैला बेल्हेकर, सारिका जाधव महिला सदस्य उपस्थित होत्या.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि धर्मनिष्ठेचा गौरव करत त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.

या दिवशी छत्रपती संभाजी महाराज यांचा बलिदान दिन अमावास्येला साजरा केला जातो. त्यामुळे दर अमावास्येला छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली वाहिली जाते ही परंपरा जपली जात आहे. धर्मवीर चौक (प्रोफेसर चौक) येथे अधिकाधिक नागरिकांनी अशा कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन धर्मवीर संभाजी महाराजांना आदरांजली वाहावी तसेच ग्रुपच्या अध्यक्षा माधवी दांगट म्हणाले की, महिलांना स्वतःचे रक्षण करण्यासाठी लाठी, काठी आणि दंड साखळी चे लवकरच शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले.



अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर एमआयडीसीतील श्री सालासर ह्युंदाई शोरूममध्ये वाहन खरेदी करताना ग्राहक वर्ग.

## श्री सालासर ह्युंदाई शोरूममध्ये वाहन विक्रीचा नवा उच्चांक

नगर – अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर एमआयडीसी परिसरातील श्री सालासर ह्युंदाई शोरूममध्ये वाहन विक्रीत अभूतपूर्व वाढ नोंदवण्यात आली. या खास दिवशी नवीन वाहन खरेदीसाठी ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात शोरूमला भेट दिली. विविध मॉडेल्सवर देण्यात आलेल्या आकर्षक सवलती, सोयीस्कर फायनान्सिंग पर्याय आणि उत्कृष्ट ग्राहक सेवा यामुळे विक्रीत मोठी वाढ झाली. शोरूम व्यवस्थापनाच्या मते, अक्षय तृतीया हा सण नवीन खरेदी आणि शुभारंभासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो, त्यामुळे ग्राहकांचा प्रतिसाद उत्साहवर्धक ठरला.

यावेळी शोरूममध्ये विविध वाहनांचे लाईव्ह प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. त्यामुळे ग्राहकांना आपल्या गरजेनुसार योग्य वाहन निवडण्याची संधी मिळाली. नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच ग्राहकांचा वाढता प्रतिसाद आणि विक्रीतील विक्रमी वाढ यामुळे श्री सालासर ह्युंदाई शोरूमने यशाचा नवा उच्चांक गाठला आहे. शोरूम मानले असून, भविष्यातही ग्राहकांना उत्कृष्ट सेवा आणि आकर्षक योजना उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले आहे.

या यशामुळे एमआयडीसी परिसरातील वाहन बाजारपेठेत अक्षय तृतीयेचा उत्साह अधिकच खुलून दिसला असून, श्री सालासर ह्युंदाई शोरूम ग्राहकांच्या विश्वासाचे प्रतीक म्हणून उदयास आले आहे.

# उन्हाळी शिबिर विद्यार्थ्यांसाठी खेळ, ज्ञान व मनोरंजनाची मेजवानी

**जगदिश झालानी यांचे प्रतिपादन**

नगर – उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त मनोरंजन आणि खेळातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शारीरिक व मानसिक विकास व्हावा. यासाठी हस्तकला, चित्रकला, विविध खेळ, योगा, इको फ्रेंडली ज्वेलरी बनवणे, पेंटिंग शो, अबॅकस यांचे प्रशिक्षण देण्यात येते. विद्यार्थ्यांच्या कला गुणांचा विकसित होतो. मेहेर इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून सर्वच मुलांना शिबिरात सहभागी होण्याची संधी दिली आहे. उन्हाळी शिबिर विद्यार्थ्यांसाठी खेळ, ज्ञान व मनोरंजनाची मेजवानीच आहे, असे प्रतिपादन मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदिश झालानी यांनी केले आहे.



हिंदसेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये मुलांसाठी आयोजित केलेल्या उन्हाळी शिबिराचे उद्घाटन करताना सुमतीलाल कोठारी आदी.

### मेहेर इंग्लिश स्कूल मध्ये उन्हाळी शिबिराचे उद्घाटन

हिंदसेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये २० ते २९ एप्रिल या कालावधीत तीन वर्ष ते तेरा वर्षे वयोगटातील मुलांसाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. याप्रसंगी सुमतीलाल कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, सारडा महाविद्यालयाच्या जुनियर कॉलेजचे चेअरमन डॉ.पारस कोठारी, भाई सथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन प्रा.ज्योती कुलकर्णी, मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदीश झालानी, विश्व मंगल आयुर्वेद चे संचालक डॉ.स्नेहलकुमार राहणे, प्राचार्य सुनील सुसरे, मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा.अनुरीता झगडे आदी उपस्थित होते.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. शाळेचे चेअरमन जगदीश झालानी व प्राचार्य अनुरीता झगडे यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे शाळेची प्रगती झपाट्याने होत आहे. नवीन वर्षात शाळेच्या नूतन इमारतीचे बांधकाम लवकरच सुरू होईल. असे त्यांनी यावेळी सांगितले.

अजित बोरा यांनी उन्हाळी शिबिरासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन या शिबिरातून विद्यार्थ्यांनी कलागुण जोपासावेत असे सांगितले.

डॉ.पारस कोठारी म्हणाले, या शिबिरासाठी विद्यार्थ्यांकडून नाममात्र शुल्क आकारण्यात आले आहे.विद्यार्थ्यांनी सकस आहार घ्यावा. उन्हाळी शिबिर ही काळाची गरज आहे. अभ्यासात गुंतून न राहता हसत खेळत शिक्षण घ्यावे

प्रा.ज्योती कुलकर्णी म्हणाले, मुलांनी फास्ट फूड, चायनीज, बर्गर, पिझ्झा, मॅगी या गोष्टींचे सेवन करू नये. तर मुलांनी पोळी भाजी, फळे यांचा आहार घ्यावा. उन्हाळी शिबिरामध्ये मनमुक्तपणे खेळण्याचा आनंद घ्यावा.

डॉ.स्नेहलकुमार राहणे यांनी फिटनेस की पाठशाळा अंतर्गत विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले जाणार आहे. असे सांगितले.

प्रास्तविकात प्रा.अनुरीता झगडे म्हणाले, उन्हाळी शिबिरातून विद्यार्थ्यांनी विविध खेळ आत्मसात करावे. नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती घ्यावी तसेच आहाराविषयी डॉक्टरांचा सल्ला देण्यात येणार आहे. या शिबिरामध्ये रेन डान्स, अबॅकस, विविध खेळांमधून प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन देविका छजलानी यांनी केले.



राष्ट्रवादी शरद पवार गटाचे विकास लवांडे यांच्या फ्लेक्सला जोडे मारत निषेध करण्यात आला.

## विकास लवांडे यांच्या फ्लेक्सला 'जोडो मारो' आंदोलन

नगर – समस्त हिंदू समाज, अहिल्यानगर यांच्या वतीने राष्ट्रवादी शरद पवार गटाचे विकास लवांडे यांच्या फ्लेक्सला चपलांनी झोडपून आणि त्याचे फ्लेक्स नालीत फेकून दिले. बस स्थानक परिसरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आंदोलनाला सुरुवात झाली. यावेळी लवांडेचा जाहीर धिक्कार केला.

यावेळी अजिंक्य नांगरे म्हणाले की, संतांचा अपमान म्हणजे महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अपमान आहे. विकास लवांडे सारख्या विकृतीला अहिल्यानगरची जनता कदापि माफ करणार नाही. हा तर फक्त ट्रेलर आहे, यापुढे संतांकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्याला घरात घुसून जाब विचारला जाईल

दिनेश जोशी यांनी इशारा देताना म्हटले, हिंदू समाजाच्या भावनांशी खेळणाऱ्या विकास लवांडेंची जागा नालीतच आहे, हे आज आम्ही दाखवून दिले. संतांच्या सन्मानासाठी समस्त हिंदू समाज सदैव रस्त्यावर उतरण्यास तयार आहे.

या 'जोडो मारो' आंदोलनात अजिंक्य नांगरे, भागवत कुरधने, दिनेश जोशी, चिरंजीव गाढवे, ओमकार हराडे, गोविंद माऊली निमसे, राजू काळे, सुमित गांगुर्डे सहभागी झाले होते


## 'स्नेहबंध'तर्फे प्लास्टिक मुक्ती पोस्टरचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते अनावरण

नगर – पर्यावरण रक्षणासाठी प्लास्टिकचा वापर टाळणे अत्यंत गरजेचे आहे. प्लास्टिकमुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून, प्रत्येक नागरिकाने याबाबत सजग राहणे आवश्यक आहे. या मोहिमेमध्ये सक्रिय सहभाग घेत, कापडी पिशव्यांचा वापर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

स्नेहबंध सोशल फौंडेशनतर्फे राबविण्यात येत असलेल्या प्लास्टिक मुक्ती अभियानाच्या पोस्टरचे अनावरण जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे उपस्थित होते.



प्लास्टिक मुक्ती अभियानाच्या पोस्टरचे अनावरण करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व 'स्नेहबंध'चे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे.



अनामप्रेम संस्थेतील अंध व दिव्यांग विद्यार्थीना फळे वाटप करण्यात आले.

## अण्णासाहेब जावळे पाटील जयंतीनिमित्त अंध आणि दिव्यांग विद्यार्थीना फळे वाटप

नगर – येथील अखिल भारतीय छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अण्णासाहेब जावळे पाटील यांच्या ४७ व्या जयंतीनिमित्त अहिल्यानगरमधील अनामप्रेम संस्थेतील अंध व दिव्यांग विद्यार्थीना फळे वाटप करुन साजरी करण्यात आली.

यावेळी कोतवाली पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक संभाजीराव गायकवाड, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे जिल्हाध्यक्ष बापू ठाणगे, पश्चिम महाराष्ट्र युवक आघाडी सचिव दत्ता वामन, अखिल भारतीय छावा संघटना जिल्हाध्यक्षा सुरेखाताई सांगळे, रावसाहेब काळे, सतीश वाघ आदींच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात फळांचे वाटप करण्यात आले.

प्रमुख पाहुणे संभाजीराव गायकवाड यांनी समाजातील वंचित व दुर्लक्षित समाज घटकांकडे समाजाने आपुलकीने व प्रेमाने पहायला हवे, छावा संघटनेचे संस्थापक अण्णासाहेब जावळे पाटील यांनी हीच शिकवण आपल्या जीवनातून दिली. आज तेच कार्य संस्था अव्याहत चालू ठेवत आहे याचे कौतुक केले.

दत्ता वामन यांनी प्रस्तावना केली, त्यांनी अण्णासाहेब जाधव यांच्या कार्याविषयी गौरवोद्गार काढले. यावेळी वेताळ मेजर, राजू रोहकले, दीपक गहिले, दिलीप गायकवाड, पिंटू पवार, रविकिरण वाघ आदी उपस्थित होते. रावसाहेब काळे यांनी आभार मानले.

# कॅलिडोस्कोप

## पाकिस्तानात शेणावर कर!

पाकिस्तानात कधी काय होईल, याचा नेम नाही. पाकिस्तानातल्या एका राज्याने चक्क जनावरांच्या शेणावर कर लावण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे जगभरातून पाकिस्तानची खिल्ली उडवली जात आहे. प्रति जनावरामागे ३० रुपये असा कर लादण्यात आलेला आहे.

पाकिस्तानच्या पंजाब प्रांतात मुख्यमंत्री मरियम नवाज यांच्या नेतृत्वाखालील सरकारने हा निर्णय घेतला आहे. पशुपालकांना आपल्या गायी आणि म्हशींच्या शेणावरही कर भरावा लागणार आहे. सरकारने प्रति जनावर दररोज ३० पाकिस्तानी रुपये 'गोबर टॅक्स' लागू केला आहे. सरकराच्या या निर्णयाची 'सोशल मीडिया'त खिल्ली उडवली जात आहे. हा कर पंजाबमधील १६८ नियुक्त 'कॅटल कॉलनी'मध्ये (पशू वसाहती) लागू करण्यात आला आहे. यामध्ये लाहोरमधील हर्बन्सपुरा आणि गुज्जरपुरा यांसारख्या प्रमुख भागांचा समावेश आहे. सरकारने याला 'स्वच्छ पंजाब' मोहिमेचा एक भाग म्हटले असून, यातून गोळा होणारे शेण स्वच्छ ऊर्जा निर्मितीसाठी वापरले जाईल, असा दावा प्रशासनाने केला आहे.

'सोशल मीडिया'त मिम्सचा पाऊस

पाकिस्तानमधील पंजाब सरकारने घेतलेल्या या निर्णयाची चेष्टा केली जात आहे. 'सोशल मीडिया'त एका युजरने म्हटले आहे, की सरकार आता मानवी विष्ठेवरही कर लावेल, तर दुसऱ्या एकाने म्हटले, की असा कर राजकारणांच्या शेणाने भरलेल्या मेंदूवर लावला पाहिजे. अभिनेत्री आणि कॉमेडियन मिशी खान हिनेदेखील या निर्णयावर टीका करताना म्हटले आहे, की सामान्य जनतेवर आधीच प्रचंड आर्थिक दबाव असताना असा निर्णय घेणे हास्यास्पद आहे. विरोधकांनी या निर्णयाला पर्यावरणाच्या नावाखाली केलेली 'वसुली' म्हटले आहे.



## नवरा घ्या भाड्याने!



युरोप खंडातील लाटविया नावाच्या एका छोटा देश सध्या चांगलाच चर्चेत आहे. या देशात मुलींना लग्नासाठी मुलगा मिळणे कठीण झाले आहे; मात्र यामागचे कारण वाचून कोणालाही धक्का बसेल. या देशाची लोकसंख्या अंदाजे १८ लाख आहे. या देशाची राजधानी रिगा ही असून, येथील लोकसंख्येचा सर्वात मोठा भाग याच शहरात वसलेला आहे. येथे स्त्रियांची लोकसंख्या पुरुषांच्या लोकसंख्येपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे. आकडेवारीनुसार, दर शंभर पुरुषांमागे येथे अंदाजे ११६ स्त्रिया आहेत. एकूण लोकसंख्येचा विचार करता, स्त्रियांचे प्रमाण साधारणपणे ५३.५ टक्के आहे, तर पुरुषांचे प्रमाण ४६.५ टक्के आहे. परिणामी, पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या सुमारे एक लाख तीस हजाराने अधिक आहे. येथे ३० वर्षांहून अधिक वय असलेल्या अनेक तरुणींना आपल्यासाठी योग्य जोडीदार शोधताना अडचणींचा सामना करावा लागतो. २० ते ३० वयोगटातील स्त्री-पुरुषांची संख्या साधारणपणे समान असते; मात्र ३० किंवा ४० वर्षांनंतर हे तफावत लक्षणीयरीत्या वाढते. ६५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या गटात, स्त्रियांची संख्या पुरुषांच्या संख्येच्या जवळपास दुप्पट झालेली दिसून येते.

लाटवियामध्ये जोडीदार शोधताना येणाऱ्या अडचणींमागे अनेक कारणे सांगितली जातात. यामध्ये पुरुषांचे सरासरी आयुर्मान कमी असणे, स्त्रियांचे सरासरी आयुर्मान जास्त असणे (अंदाजे ८०-८१ वर्षे), चांगल्या नोकरीच्या संधींच्या शोधात पुरुषांचे परदेशात स्थलांतर करणे आणि घटस्फोटांचे प्रमाण जास्त असणे, यांसारख्या विविध घटकांचा समावेश होतो. परिणामी विशेषतः ३० वर्षांहून अधिक वय असलेल्या स्त्रिया विवाहासाठी पुरुष जोडीदाराचा शोध सक्रियपणे घेत असतात.

असेही सांगितले जाते, की पुरुषांच्या कमतरतेमुळे येथे 'एका तासासाठी पती' ही सेवा बऱ्यापैकी लोकप्रिय झाली आहे. या सेवेद्वारे स्त्रिया तासाच्या हिशोबाने एखाद्या पुरुषाला कामावर नेमू शकतात. ही सेवा कोणत्याही प्रकारच्या प्रेमसंबंधांसाठी किंवा विवाहासाठी नसून, ती केवळ घरगुती कामांसाठी जसे की प्लंबिंग (नळकाम), फर्निचर जोडणे, दुरुस्तीची कामे, रंगकाम आणि तत्सम कामांसाठी आहे. एकट्या राहणाऱ्या स्त्रिया घराच्या देखभालीची ही छोटी मोठी कामे उरकून घेण्यासाठी या सेवेचा वापर करतात.

एखाद्या व्यक्तीने लाटवियातील महिलेशी विवाह केला, तर त्या व्यक्तीला तात्पुरता निवासी परवाना मिळू शकतो. हा परवाना साधारणपणे पाच वर्षांपर्यंत नूतनीकरण करता येतो. त्यानंतर, या प्रक्रियेमुळे कायमस्वरूपी निवासी दर्जा मिळण्याचा आणि कालांतराने नागरिकत्व प्राप्त करण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांमध्ये विवाह प्रमाणपत्र, पुरेशा उत्पन्नाचा पुरावा, आरोग्य विमा आणि निवासाचा पुरावा यांचा, तसेच इतर काही कागदपत्रांचा समावेश होतो. विवाहानंतर अपत्ये जन्माला आली, तर तेथील सरकारकडून त्यांना विशिष्ट स्वरूपाची मदत पुरवली जाते; पण तुम्ही त्या देशात वास्तव्य करत असता, नोकरी करत असता आणि नियमितपणे कर भरता तेव्हाच ही मदत उपलब्ध होते.

## पूनावालांची कार २२ कोटींची!



भारत हे जगातील तिसरे सर्वात मोठे कार मार्केट आहे; पण येथे बहुतेक लोक बजेट कारच घेतात. काही श्रीमंत लोकांसाठी खास लग्झरी कार उपलब्ध आहेत. यातली सर्वात महागडी कार म्हणजे रोल्स-रॉयस फॅन्टम ८ इडब्ल्यूबी. ही कार पुण्यातील प्रसिद्ध उद्योगपती योहान पूनावाला यांच्या मालकीची आहे. ही नवीन कार भारतातल्या सर्वात महागड्या गाड्यांपैकी एक आहे.

ही कार इतकी महागडी आहे, की तिच्या एका किंमतीत जवळपास ६३ टोयोटा फॉर्च्युनर गाड्या विकत घेता येतील. फॉर्च्युनर ही एक महागडी एसयूव्ही मानली जाते, तरीही ६३ गाड्यांची किंमत या एका रोल्स-रॉयस कारच्या बरोबरीने येते. या तुलनेतून लक्षात येते, की ही गाडी किती खास आणि श्रीमंती वर्गासाठी बनवली गेली आहे. सामान्य कारपेक्षा तिची किंमत इतकी जास्त का आहे, याचे उत्तर तिच्या लग्झरी फीचर्समध्ये दडलेले आहे.

**कारचा आकर्षक आणि वेगळा रंग**

या कारचा रंग बोहेमियन रेड आहे. हा रंग अगदी वेगळा आणि प्रीमियम दिसतो. रस्त्यावरून जाताना ही गाडी इतर सर्व गाड्यांपासून सहज ओळखता येते. लाल रंगामुळे ती खूप आकर्षक आणि शानदार वाटते. सामान्य कार्समध्ये असा खास रंग दिसत नाही. हा रंग निवडून मालकाने कारला आणखी वैयक्तिक आणि राजेशाही स्वरूप दिले आहे. दिवसभरात किंवा रात्रीही हा रंग चमकतो आणि लोकांचे लक्ष वेधून घेतो.

कारच्या समोर 'स्पिरिट ऑफ एक्स्टसी' नावाचा लोगो आहे. तो पूर्णपणे सॉलिड गोल्ड म्हणजे शुद्ध सोन्याचा बनवला गेला आहे. हा छोटासा लोगो कारची लग्झरी पातळी आणखी वाढवतो. सोने वापरल्याने कारला राजघराण्यातील वस्तूसारखे स्वरूप मिळते. ही डिटेल फक्त श्रीमंत मालकांसाठीच शक्य असते. लोगो पाहिल्यावर लगेच लक्षात येते, की ही गाडी सामान्य नाही, तर जगातील टॉप लग्झरी ब्रँडची आहे.

इल्यूमिनेटेड ग्रिल रोल्स-रॉयस फॅन्टममध्ये एक खास फीचर आहे. ही ग्रिल रात्री चमकते आणि खूप रॉयल लुक देते. दिवसात तर ती सुंदर दिसते; पण रात्री तिची चमक पाहून प्रत्येकाचे डोळे थांबतात. ही ग्रिल कारला राजेशाही स्वरूप देते. रस्त्यावरून जाताना ती इतर गाड्यांपेक्षा वेगळी आणि आकर्षक वाटते. ही डिटेल रोल्स-रॉयस कंपनीची खास ओळख आहे आणि ती कारच्या एकूण डिझाइनला पूर्ण करते.

ही कार सामान्य नसून मालक योहान पूनावाला यांच्या आवडीप्रमाणे कस्टमायझ केली गेली आहे. कारमध्ये खास 'कोच लाइन' बनवली आहे आणि मागच्या बाजूला मोठा 'पी' अक्षर कोरले आहे. हे 'पी' पूनावाला नावाचे प्रतीक आहे. असे वैयक्तिक स्पर्श फक्त या कंपनीकडून मिळतात. यामुळे कार मालकाची ओळख बनते आणि ती एका प्रकारे 'एकच अशी' गाडी होते. सामान्य कार्समध्ये असे बदल करता येत नाहीत. कारमध्ये २२ इंची ब्रश्ड सिल्वर ॲलॉय व्हील्स बसवले आहेत. ही चाके खूप मोठी आणि स्टाइलिश आहेत. ती केवळ सुंदर दिसत नाहीत, तर कारचा रस्त्यावरील दबदबा वाढवतात. ही गाडी रस्त्यावर येते तेव्हा तिचे आकारमान आणि चाके पाहून लोक थांबतात. ही चाके कारला मजबूत आणि लग्झरी लुक देतात. एकूणच, ही सर्व वैशिष्ट्ये मिळून रोल्स-रॉयस फॅन्टम ८ इडब्ल्यूबीला भारतातील सर्वात महागडी आणि सर्वात खास कार बनवतात. ही गाडी फक्त श्रीमंती दाखवत नाही, तर इंजिनीअरिंग आणि लग्झरीचा उत्तम नमुना आहे. तिची किंमत सुमारे २२ कोटी रुपये आहे. एवढी प्रचंड किंमत असल्याने ही कार सामान्य माणसाच्या आवाक्यात नाही; पण लग्झरी जगात ती खूप प्रसिद्ध आहे.

## ॲप आणतेय तणाव!

हल्ली प्रत्येक व्यक्तीच्या हातात मोबाईल आणि अनेकांच्याच हातात स्मार्टफोन दिसतो. अशा या डिजिटल विश्वामध्ये विविध ॲप वापरणाऱ्यांचा आकडासुद्धा तितकाच मोठा आहे. एकीकडे देश 'डिजिटल इंडिया'च्या मार्गावर एका क्लिकवर बहुतांश कामं साध्य करताना दिसत आहे. दुसरीकडे याच 'डिजिटल इंडिया'ची नकोशी बाजूसुद्धा समोर आली आहे.

एकाएकी डिजिटल विश्वाच्या या नकोशा बाजूवर लक्ष केंद्रित होण्यामागचं कारण म्हणजे विवाहबाह्य प्रेमप्रकरणांना प्रोत्साहन देत असलेल्या एका ॲपवरून आता वादंग माजलं आहे. इतकं, की या प्रकरणात मानवाधिकार आयोगालाही लक्ष घालावं लागत आहे. ४० लाख यूजर्स असणारं हे ॲप म्हणजे ग्लिडेन. वैवाहिक नात्यात तणाव आणण्यापासून घरगुती हिंसा आणि टोकाची पावलं उचलण्यात प्रवृत्त करण्याचा गंभीर आरोप या ॲपवर होत आहे.

भारतात अतिशय वेगानं चर्चेत आलेल्या ग्लिडेन ॲपसंदर्भातील वाद आता कायद्याच्या चौकटीत पोहोचला आहे. जवळपास ४० लाखांहून अधिक भारतीय यूजर्स असणाऱ्या या ॲपसंदर्भात केंद्रीय मावाधिकार आयोगानं कठोर पावलं उचलल्याचं पाहायला मिळत आहे. ज्या धर्तीवर आता इलेक्ट्रॉनिक्स व सूचना प्रौद्योगिकी मंत्रालयाला रीतसर नोटिस बजावत या ॲपची वैधता आणि त्याच्या कारवाईसंदर्भातील सविस्तर अहवाल मागवण्यात आला आहे.




'ग्लिडीन ॲप' संदर्भातील वाद 'उत्थान फाउंडेशन' नावाच्या संस्थेच्या तक्रारीपासून सुरू झाला. त्यात नमूद करण्यात आल्यानुसार हे ॲप विवाहित व्यक्तींना विवाहबाह्य प्रेमसंबंधांसाठी प्रवृत्त करतं, असा आरोप आहे. या तक्रारीनंतर एनएचआरसी सदस्य प्रियंक कानुनगो यांनी या प्रकरणामध्ये गांभीर्यानं लक्ष घालत 'सोशल मीडिया'वर त्याबाबतची एक पोस्टसुद्धा शेअर केली. त्यात त्यांनी तक्रारीचा उल्लेख करत हे ॲप 'ॲडल्टरी ॲंड सेक्सुअल इनव्हिटेशन्स' ला दुजोरा देत असल्याची बाब अधोरेखित केली. 'एनएचआरसी' च्या नोटिसमध्ये नमूद करण्यात आल्यानुसार अशा पद्धतीची नाती भारतात सामाजिक आणि कौटुंबिक रचनेसाठी धोकादायक ठरू शकतात. ही नाती वैवाहिक नात्यांवर परिणाम करत घरगुती हिंसाचार, मानसिक अस्थैर्य अशा समस्यांना वाव देतात. आयोगानुसार 'ग्लिडन' द्वारे दिल्या जाणाऱ्या सुविधा भारतीय संस्कृती आणि मान्यतांविरोधातील असून, अशा स्थितीत भारतातील कायद्याला अनुसरूनच या ॲपची कारवाई होतेय की नाही, याच्या पडताळणीची गरज असल्याचा मुद्दा डोके वर काढतो.

## जेसीबीची रंजक कथा





खोदकामासाठी किंवा ढिगारा उचलण्यासाठी जेसीबीचा वापर केला जातो. अलिकडे तर कोणा मंत्र्याच्या स्वागतासाठीही भलामोठा हार घालताना वा पुष्पवृष्टी करण्यासाठीही या यंत्राचा वापर वाढत आहे. असो... जेसीबी पिवळ्या रंगाची असते. जेसीबी जगभरात वापरली जाते. या उपकरणाला आपण जेसीबी याच नावाने ओळखतो. या उपकरणाची रंजक माहिती जाणून घेऊ.

जेसीबी ही ब्रिटनमधली एक कंपनी आहे. याचं मुख्यालय इंग्लंडमधल्या स्टॅफर्डशायर शहरात आहे. जेसीबी या उपकरणाची निर्मिती १९४५ मध्ये करण्यात आली. तेव्हा या उपकरणाला काहीच नाव देण्यात आलं नव्हतं. निर्मात्यांनी याच्या नावाबाबत बरंच चर्वितचर्वण केलं. पण सुयोग्य नाव न मिळाल्याने निर्माते जोसेफ सायरिल बमफोर्ड यांच्या नावाची आद्याक्षरं जोडून जेसीबी असं नाव देण्याचं ठरलं. आज हीच या उपकरणाची ओळख बनली आहे. जेसीबी ही भारतात कारखाना सुरू करणारी पहिली खासगी ब्रिटिश कंपनी आहे. आज जेसीबी उपकणांची सर्वाधिक निर्यात भारतातच केली जाते. १९४५ मध्ये जोसेफ बमफोर्ड यांनी सर्वात पहिल्यांदा एक टिपिंग टेलर तयार केला होता. त्यावेळी त्याची किंमत ४५ पाउंड होती. जेसीबीने १९९१ मध्ये जगातला सर्वात जलद 'फास्टट्रॅक' नावाचा ट्रॅक्टर तयार केला होता. १९४८ मध्ये या कंपनीत फक्त सहा लोक काम करत होते. सुरुवातीच्या काळात जेसीबी उपकरणांना लाल आणि पांढरा रंग दिला जायचा. मात्र नंतर हे उपकरण पिवळ्या रंगातच उपलब्ध करून देण्यात आलं. जेसीबीचा वापर खोदकामासाठी केला जातो. पिवळ्या रंगामुळे हे उपकरण कुठेही दिसू शकतं आणि खोदकाम सुरू असल्याची जाणीव लोकांना होते. याच कारणामुळे जेसीबीला पिवळा रंग देण्यात आला.

## ठसे टिकून राहतील

नील आमस्ट्राँगने चंद्रावर पहिलं पाऊल ठेवलं तर १९७२ मध्ये चंद्राच्या पृष्ठभागावर आपल्या पावलांचे ठसे उमटवणारा युजीन सेरनन हा अखेरचा अंतराळवीर होता. यानंतर कोणीची चंद्रावर गेलेलं नाही. या घटनेला बराच काळ उलटून गेला आहे. मात्र त्याच्या पावलांचे ठसे चंद्रावर अजूनही टिकून आहेत. अंतराळ हे एक गूढ आहे. त्यातली अनेक रहस्य अजूनही उलगडलेली नाहीत. चंद्रावरचे पावलांचे ठसे नष्ट न होण्यामागेही काही शास्त्रीय कारणं आहेत. चंद्र हा पृथ्वीचा एकमेव नैसर्गिक उपग्रह आहे. चंद्राच्या उत्पत्तीची कहाणी मोठी रंजक आहे. साधारण ४५० कोटी वर्षांपूर्वी एक उल्कापिंड आदळल्याने पृथ्वीचा एक भाग तुटून वेगळा झाला आणि त्यापासून चंद्राची निर्मिती झाली असं शास्त्रज्ञांचं मत आहे. पृथ्वीवरून चंद्राचा फक्त ५९ भाग दिसतो, असं शास्त्रज्ञ सांगतात. गंमत म्हणजे अंतराळातून चंद्र गायब झाला तर पृथ्वीवरचा दिवस फक्त सहा तासांचा असेल. एरिजोना विद्यापीठातले एक शास्त्रज्ञ मार्क रॉबिन्सन यांच्या मते चंद्र मातीचे खडक आणि धुळीच्या थराने झाकलेला आहे. या थरात मातीचे कणही असतात. याच कारणामुळे चंद्राच्या पृष्ठभागावर उमटलेले पावलांचे ठसे वर्षानुवर्ष टिकून रहातात. पुढची अनेक वर्ष हे ठसे तसेच राहतील असं त्यांचं म्हणणं आहे.



## गोमूत्रात चक्क सोन्याचे कण!

सोने म्हटलं की अनेकांच्या डोळ्यासमोर खाणींचीच प्रतिमा उभी राहते; पण प्रत्यक्षात हा मौल्यवान धातू केवळ खाणीतच सापडत नाही, तर काही अनपेक्षित ठिकाणीही त्याचे अंश आढळतात. अलीकडील संशोधनांमधून अशाच काही रोचक गोष्टी समोर आल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांच्या कुतूहलात भर पडली आहे. भारतात सोन्याला केवळ गुंतवणुकीचे साधन म्हणून नाही, तर भावनिक आणि सांस्कृतिक महत्त्वही आहे. लग्नसमारंभ, सण-उत्सव आणि विविध परंपरांमध्ये सोन्याचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. महिलांच्या अलंकारांपासून ते समृद्धीच्या प्रतीकापर्यंत, सोन्याचे स्थान भारतीय समाजात विशेष मानले जाते.



वैज्ञानिकांच्या मते, सोने केवळ जमिनीखालीच नाही, तर समुद्रातही प्रचंड प्रमाणात साठवलेले आहे. मानवी शरीरातसुद्धा अतिशय सूक्ष्म प्रमाणात सोने आढळते. इतकेच नाही, तर काही वनस्पतींमध्ये आणि सूक्ष्मजीवांमध्येही सोन्याचे अंश सापडल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. या संदर्भात जुनागढ कृषी विद्यापीठातील संशोधन विशेष चर्चेत आले आहे. जवळपास चार वर्षांच्या अभ्यासानंतर शास्त्रज्ञांनी गीर वंशाच्या गायींच्या मूत्रात सोन्याचे सूक्ष्म कण आढळल्याचा दावा केला आहे. या अभ्यासानुसार, एका लिटर लघवीत सुमारे ३ ते १० मिलिग्रॅम इतके सोन्याचे अंश सापडतात. हे सोने धातूच्या स्वरूपात नसून 'गोल्ड सॉल्ट' म्हणजेच आयन स्वरूपात असल्याचे संशोधकांनी स्पष्ट केले आहे.

जैवतंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. बी. ए. गोलकिया यांच्या नेतृत्वाखालील पथकाने क्रोमॅटोग्राफी आणि मास स्पेक्ट्रोमेट्रीसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ही तपासणी केली. या प्रक्रियेत गायीच्या मूत्रात सुमारे ५१०० वेगवेगळे घटक आढळले, त्यापैकी ३८८ घटक वैद्यकीयदृष्ट्या महत्त्वाचे असल्याचे नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, वैज्ञानिक जगतात आणखी एक रोचक गोष्ट समोर आली आहे. क्युप्रियाव्हीडस मेटॅलीड्युरन्स नावाचा एक जीवाणू विशिष्ट रासायनिक प्रक्रियेद्वारे सूक्ष्म स्वरूपातील सोन्याचे कण तयार करू शकतो.

## झोपेचे गणितच वेगळे

प्रत्येक सजीवासाठी झोप खूप महत्त्वाची आहे. माणसाला रात्री सात ते आठ तासांची झोप मिळायला हवी. माणूस अन्नपाण्याशिवाय काही काळ जगू शकतो. पण न झोपता त्याला फार काळ रहाता येत नाही. माणसांना सात ते आठ तास झोप गरजेची असते. पण प्राण्यांचं तसं नसतं. काही प्राणी कमी वेळ झोपतात तर काही प्राण्यांचं अर्ध्यापेक्षा जास्त आयुष्य झोपेत जातं. उष्ण कटिबंधातल्या दक्षिण अमेरिकन देशांमध्ये नाईट मंकी आढळतो. ही माकडं २४ पैकी १७ तास झोपलेले असतात. जगभरात सापांच्या जवळपास २५०० प्रजाती आहे. त्या पैकी अजगर अठरा तास निद्रिस्त असतो. दक्षिण अमेरिका आणि अर्जेटिनाच्या उत्तर भागात आढळणारा आर्मांडिलो नावाचा प्राणीही १८ तास झोपतो. ऑस्ट्रेलियात आढळणारा कोआला हा गोंडस प्राणी जवळपास २२ तास झोपतो. जिराफ खूप कमी वेळ झोपतो. एका वेळी तो पाच मिनिटं झोपतो तर दिवसभराची अर्धा तास झोप जिराफाला पुरते.



# एआय सारख्या मायावी धोक्याशी लढण्याची ताकद रामचरित मानस देईल

## डॉ. कुमार विश्वास यांचे प्रतिपादन, सुमारे २५ हजार भाविकांच्या उपस्थितीत राम कथेचा भक्तीपूर्ण वातावरणात समारोप



स्वर्गीय अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ काका ट्रस्टच्या वतीने आयोजित डॉ.कुमार विश्वास यांच्या राम कथेचा समारोप पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी सचिन जगताप व आ.संग्राम जगताप यांनी श्रीकृष्णाची मूर्ती देऊन डॉ.कुमार विश्वास यांचा विशेष सन्मान केला. यावेळी वाल्मीक कुलकर्णी, अनिल मोहिते, मनीष छाजेड, निलेश भिसे, राजेश भंडारी, विकी जगताप व गणेश गोंडाळ उपस्थित होते.

नगर– आजची तरुण पिढीच नव्हे तर एकूणच समाजमन एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) या मायावी समस्याशी झुंजत आहे. या तंत्रज्ञानाने अनेकांचे काम हिरावून घेतले गेले आहे. चुकीच्या व्हिडिओद्वारे समाजमन कलुषित केले जात आहे, पण या धोक्यातून वाचण्याचा उपाय राम कथेत आहे. तरुण पिढीने किंबहुना सर्वांनीच रामचरित मानस वाचले तर रामायण काळातील मायावी शक्तींना प्रभू रामाने कसे नेस्तनाबूत केले याचे दाखले त्यात आहेत. ते संशोधनाच्या दृष्टीने तपासले तर रामचरित मानस एआय सारख्या मायावी धोक्याच्या समस्याशी लढण्याची ताकद देईल, असा विश्वास व्याख्याते डॉ. कुमार विश्वास यांनी केला.

माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त आमदार संग्राम जगताप व सचिन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली काका ट्रस्टच्या वतीने डॉ. विश्वास यांची 'अपने अपने राम' ही राम कथा आयोजित केली होती. तिचे तिसरे पुष्प गुंफून समारोप करताना डॉ. विश्वास यांनी श्रीरामाने अनेक संकटांशी झुंज देत यश मिळवताना मानवी जीवनातही संकटाशी सामना करून यशस्वी होण्याचा संदेश दिला. नगरकर भाविकांना तीन दिवस राममय करून रामकथेची अद्भुत पर्वणी दिल्याबद्दल डॉ.कुमार विश्वास यांचा सचिन जगताप व आ.संग्राम जगताप यांनी श्रीकृष्णाची मूर्ती देऊन विशेष सन्मान केला. डॉ. विश्वास यांनी ती मूर्ती स्वतःच्या डोक्यावर घेऊन भाविकांना अभिवादन केले.

राष्ट्रीय पाठशाळेच्या मैदानावर गेल्या तीन दिवसांपासून ही राम कथा भक्तिपूर्ण वातावरणात रंगली होती. दररोज हजारो भाविकांचा प्रतिसाद मिळाला. समारोपाच्या वेळी सुमारे २५ हजार भाविक उपस्थित होते. यावेळी उपस्थित पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते श्रीराम मूर्तीचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमास हभप जंगलेशास्त्री महाराज, आ. मोनिका राजळे, आ.हेमंत ओगले, भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे, जिल्हा परिषदेचे सीईओ आनंद भंडारी, मनपा आयुक्त यशवंत डांगे, समर्थ भक्त मंदारबुवा रामदासी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक वाल्मीक कुलकर्णी, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, श्रीमती पार्वतीबाई जगताप, उद्योजक मनीष छाजेड, मृत्युंजय नाटकाचे दिग्दर्शक निलेश भिसे, विचार भारतीचे रवींद्र मुळे, भाजपा महिला आघाडीच्या अश्विनी थोरात, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्यासह युतीचे नगरसेवक उपस्थित होते. काका ट्रस्ट व जगताप परिवाराच्या वतीने सुवर्णा जगताप, शितल जगताप, डॉ.वंदना फाटके, राजेश भंडारी, अनिल मुरकुटे, गणेश गोंडाळ, नगरसेवक विकी जगताप, अजित जगताप, अनुप काळे, शशीकांत घीगे आदींनी स्वागत केले.

यावेळी प्रवचनात बोलताना डॉ. कुमार विश्वास यांनी आद्य शंकराचार्यांचे जयंतीनिमित्त स्मरण केले व रामचरित मानस अभ्यास करण्याचे आवाहन केले. मरीच राक्षसाने हरणाचे रूप घेतले तर रावणाने साधू वेश घेऊन सीतेचे अपहरण केले. हे त्या काळचे मायावी एआय तंत्रज्ञानच होते. त्यानंतर खर व दूषण या राक्षसांनी मायाजाल पसरवताना युद्धात रामाला संभ्रम येईल अशी माया केली. तेही त्या काळातील 'एआय'चाच प्रकार होता. मात्र, प्रभू रामाने अमोघ बाणाच्या साह्याने हे मायाजाल नष्ट करत त्यांचे कोडींग तोडून माया नष्ट केली, त्यामुळे या मागचे तंत्रज्ञान संशोधनाच्या माध्यमातून स्पष्ट केले तर आपण पण एआय सारख्या मायावी धोक्याचा सामना करू शकतो, असा दावा विश्वास यांनी केला.

डॉ.कुमार विश्वास पुढे म्हणाले, रामाने कोणतेही देवत्व न दाखवता फक्त मानवी जीवनातील समस्या मिटवण्यासाठी कसा संघर्ष आवश्यक आहे हे आपल्या आदर्श जीवनातून दाखवून दिले. त्याने वनवास स्वीकारला, काट्याकुट्यातून रस्ता काढला, पत्नीचे अपहरण झाले, बलाढ्य शत्रूशी लढताना वनवासी लोकांचे सहाय्य घेतले, शत्रूचा शरण आलेला भाऊ बिभीषणला लंकाधिश करण्याचे वचन दिले, शत्रूशी लढताना भावाचे व मित्रांचे सहाय्य घेतले आणि सर्वात महत्त्वाचे स्वतःच्या क्षमतेवर व शौर्यावर विश्वास ठेवला. मानवी जीवनातही अशा अनेक समस्या प्रत्येकाला येतात पण त्यामुळे हतबल न होता समर्थपणे त्यांचा सामना करण्याचा संदेश रामायणातून दिला गेला आहे, असे डॉ. विश्वास यांनी नमूद केले.

सध्याच्या काळात प्रत्येकाची उपयोगिता पाहिली जाते व त्यामुळेच वृद्धाश्रम वाढत असल्याचे दुर्दैव आहे. परंतु माता–पिता व साधुसंतांची उपयोगिता पाहू नये. त्यांचे अस्तित्वच नवा आत्मविश्वास देते. तुम्ही आई–वडिलांसोबत राहिले नाही तर तुमची मुलेही तुमच्या समवेत राहणार नाहीत. हितसंबंध व सत्य स्वीकारण्याची वेळ आली तर सत्य स्वीकारा. स्वतः रामाने त्याच्या जीवनातून हे दाखवून दिले आहे, असे स्पष्ट करताना डॉ. विश्वास म्हणाले, घरातील मोठा भाऊ पित्यासमान व मोठी वहिनी मातेसमान असते तर धाकट्या भावाने प्रभू रामाची सावली असलेल्या लक्ष्मणासारखे असले पाहिजे. घरात देवाचे मंदिर हवे, दारूचा बार असणे हे पतन होण्याचे लक्षण आहे. दान देताना नावाचे प्राबल्य नको, असे आवाहनही त्यांनी केले.

### स्वतःवरचा विश्वास कधीही डळमळीत होऊ देऊ नये

डॉ.कुमार विश्वास यांनी सीतेचे अपहरणानंतरचा जखमी झालेल्या जटायू पक्षी व रामाच्या संवादाचा प्रसंग सांगितला. यामध्ये जटायू मृत्यूनंतर स्वर्गात राजा दशरथ यांना सीता अपहरण झाल्याचे सांगू का, असे विचारले असता रामाने नकार दिला व मी शक्तिशाली कुळातील असेल्याने असा पराक्रम करून रावणाला संपवेल की मृत्यूनंतर तो स्वतः दशरथ यांना मी केलेला पराक्रम सांगेन, असा आत्मविश्वास रामाने व्यक्त केला. यातून स्वतःवरचा विश्वास कधीही डळमळीत होऊ देऊ नये असा संदेश प्रत्येकाने घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

राम कथा सुरु होत्या अगोदर देशात नावाजलेल्या गायक कलाकारांनी अनेकविध सुंदर भजन सादर करून त्यांनी भाविकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी मंत्रमुग्ध होत भारावलेले हजारो भाविकांनी श्रीरामाचा जयघोष केला.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे २४ एप्रिल रोजी मोफत मूत्रविकार तपासणी शिबीराचे आयोजन

नगर – जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे २४ एप्रिल रोजी सकाळी १० ते २ यावेळेत मूत्रविकार मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पूर्ण वेळ मूत्र विकार तज्ज्ञ डॉ. अजित दरंदले, व्हिजिटिंग कन्सल्टंट युरोलॉजीस्ट डॉ. संकेत काळपांडे, युरोलॉजीस्ट डॉ. अमेय सांगळे, डॉ. स्वनित देशपांडे शिबिरात तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.

हॉस्पिटलमध्ये मूत्र विकारावर अद्ययावत उपचार सुविधा उपलब्ध आहेत. शिबिरात प्रोस्टेट रोग व्यवस्थापन, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरूष वंध्यत्व समुपदेशन, मूल्यमापन व व्यवस्थापन, महिलांचे मूत्र मार्गातील विकार, मूत्रमार्ग, मूत्राशय, प्रोस्टेट, जननेंद्रिय, अंडाशय कर्करोग व्यवस्थापनतपासणी व उपचार मार्गदर्शन केले जाईल.

हॉस्पिटलमध्ये हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक मशीनद्वारे डायलेसिस सुविधा उपलब्ध आहे. तसेच २४ तास आनंदऋषीजी ब्लड बँक सेवा उपलब्ध आहे. डिजिटील एक्स रे २५० रुपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, सिटी स्कॅन १२५० रुपये, एम.आर. आय. २५०० रुपयांत उपलब्ध आहे. शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी संपर्क – ०२४१–२३२०४७३/७४/७५/७६

# शिवछत्रपती क्रीडा प्रबोधिनीमध्ये २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू

नगर – राज्यातून अधिकाधिक आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याच्या उद्देशाने, प्रतिभावान खेळाडूंची निवड करून त्यांना शास्त्रोक्त प्रशिक्षण, संतुलित आहार व आधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य तसेच शिवछत्रपती क्रीडापीठ यांच्या अंतर्गत राज्यात विविध क्रीडा प्रबोधिनी कार्यरत आहेत. सन २०२६–२७ या वर्षासाठी शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत ९ क्रीडा प्रबोधिनींमध्ये 'सरळ प्रवेश' (४० टक्के) व 'कौशल्य चाचणी' (६० टक्के) या निकषांवर आधारित निवासी व अनिवासी प्रकारचे प्रवेश देण्यात येणार आहेत. इच्छुक खेळाडूंनी गुगल फॉर्मद्वारे २३ एप्रिल पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे.

राज्यात पुणे, कोल्हापूर, ठाणे, अमरावती, अकोला, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि गडचिरोली या ९ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनींची स्थापना झाली असून, या प्रबोधिनींमध्ये क्रीडा प्रशिक्षार्थींची निवड करण्यासाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

### प्रवेशासाठी २३ एप्रिल पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

या प्रबोधिनींमध्ये ज्युडो, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, शूटिंग, फुटबॉल, जलतरण, ॲथलेटिक्स, कुस्ती, बॅडमिंटन, आर्चरी, हँडबॉल, टेबल टेनिस, व्हॉलीबॉल, सायकलिंग आणि बॉक्सिंग अशा १५ क्रीडा प्रकारांमध्ये प्रशिक्षण दिले जाते.

प्रवेश प्रक्रियेत 'सरळ प्रवेश' आणि 'कौशल्य चाचणी' असे दोन प्रकार आहेत. सरळ प्रवेश प्रक्रियेत संबंधित खेळात राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले किंवा राज्याचे प्रतिनिधित्व केलेले १९ वर्षांखालील वयोगटातील खेळाडू तज्ज्ञ समितीसमोर घेतल्या जाणाऱ्या चाचणीद्वारे पात्र ठरविले जातात. या प्रकारात अर्जांची संख्या ४० टक्क्यांपेक्षा अधिक असल्यास गुणवत्तेनुसार प्राधान्यक्रम ठरवून प्रवेश दिला जाईल.

कौशल्य चाचणी प्रकारात संबंधित खेळात राज्यस्तरावर सहभागी झालेल्या १९ वर्षांखालील वयोगटातील खेळाडूंसाठी विशेष चाचणी आयोजित केली जाईल आणि त्यानुसार गुणवत्तेवर आधारित निवड करण्यात येईल. तसेच, खेलो इंडिया राज्य गुणवत्ता केंद्र (पुणे) अंतर्गत ॲथलेटिक्स, सायकलिंग आणि शूटिंग या क्रीडा प्रकारांसाठी २० वर्षांखालील वयोगटातील खेळाडूंची निवड तज्ज्ञ समितीसमोर होणाऱ्या चाचणीद्वारे केली जाणार आहे.

राज्यातील उदयोन्मुख खेळाडूंसाठी ही एक महत्त्वपूर्ण संधी असून, २०२६–२७ या शैक्षणिक वर्षासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. विभागीय तसेच राज्यस्तरीय चाचण्यांसाठी सहभागी होणाऱ्या खेळाडूंची माहिती संकलित करण्यासाठी https://forms.gle/aqnpWXJKP2wsMVpdA ही गुगल लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्व पात्र खेळाडूंनी २३ एप्रिल पर्यंत या लिंकवर नोंदणी करणे आवश्यक आहे.

विहित मुदतीनंतर नोंदणी केलेल्या खेळाडूंची यादी संबंधित विभागीय उपसंचालकांकडे पाठवण्यात येईल. ज्या खेळाडूंनी अद्याप नोंदणी केलेली नाही, मात्र त्यांची नावे जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांकडे प्राप्त झाली आहेत, त्यांची माहिती तत्काळ विभागीय स्तरावर पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, नोंदणी न करता थेट चाचणीच्या दिवशी उपस्थित राहणाऱ्या खेळाडूंनाही संधी देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असून, कोणताही पात्र खेळाडू या संधीपासून वंचित राहू नये यासाठी ही व्यवस्था करण्यात आली आहे. क्रीडा प्रबोधिनीच्या निवड चाचण्या प्रथम विभागीय स्तरावर आणि त्यानंतर राज्यस्तरावर पार पडणार आहेत.

# अत्याधुनिक उपचार सुविधांसह सरस्वती हॉस्पिटलची सुपर स्पेशालिटी वाटचाल

नगर – आई व तिच्या गोंडस बाळाचे भावविश्व वैद्यकीय कौशल्य आणि आपुलकीच्या भावनेने जपणाऱ्या सरस्वती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल ९ वा वर्धापन दिन साजरा करीत असून विश्वासार्हतेच्या शिदोरीवर दशकपूर्तीकडे वाटचाल करीत आहे. स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.अमोल जाधव व डॉ.प्राजक्ता जाधव यांनी या वाटचालीत सामाजिक जाणीव ठेवून अत्याधुनिक रूग्णसेवा देण्यावर भर दिला आहे. त्यामुळेच केवळ अहिल्यानगर जिल्हाच नाही तर शेजारील जिल्ह्यातील रूग्णही याठिकाणी विश्वासाने प्रभावी उपचारांसाठी येतात. काळानुरूप बदल अंगिकारत सरस्वती हॉस्पिटल अधिकाधिक आधुनिक सेवा देण्यासाठी सुपर स्पेशालिटी रूपात समोर येत आहे.

याठिकाणी आता सुपर डव्हान्स लॅप्रोस्कोपी सुविधा उपलब्ध झाली आहे. गायनेकोलॉजी, जनरल सर्जरी, युरोलॉजी या सर्व विभागांसाठी एकत्रितपणे वापरता येणारी अत्याधुनिक लॅप्रोस्कोपी सिस्टम उपलब्ध करण्यात आली आहे. ४ के/ एचडी व्हिज्युलायझेशन सिस्टीममुळे अत्यंत स्पष्ट आणि झूम डिटेल्स दिसत असल्याने शस्त्रक्रिये दरम्यान अधिक अचूकता मिळण्यास मदत होते. छोट्या चिरांद्वारे ऑपरेशन होऊन कमी वेदना, कमी रक्तस्राव आणि जलद रिकव्हरी होते. सुरक्षित टिश्यू कटिंग आणि ब्लीडिंग कंट्रोलसाठी आधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत. यामुळे विविध रोगांवरील शस्त्रक्रिया, हर्निया, गॉलब्लॅडर, अपेंडिक्स, किडनी, प्रोस्टेट, संबंधित शस्त्रक्रिया अधिक अचूक होण्यास मदत होते. कॉर्पोरेट हॉस्पिटल लेव्हलचे हाय–कॉस्ट, हाय–परफॉर्मन्स मशीन कार्यान्वित झाले आहेत.

बाळंतपणात आईच्या गर्भात असलेल्या बाळाची वाढ, त्याचे आरोग्य तपासणीसाठी सोनोग्राफी महत्त्वाची असते. सरस्वती

### अचूक निदान व परिणामकारक उपचारांचा रूग्णांना लाभ : डॉ. अमोल जाधव



सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे आता सध्याच्या काळातील सर्वात आधुनिक ॲडव्हान्स ५ डी सोनोग्राफी मशीन (ॲनोमली स्कॅन) कार्यान्वित झाले आहे. यामुळे गर्भातील बाळाच्या आरोग्याचे अत्यंत सखोल व अचूक परीक्षण शक्य झाले आहे. हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे मॉड्युलर ऑपरेशन थिएटर उभारण्यात आले असून अधिक सुरक्षित, इन्फेक्शन कंट्रोल आणि उच्च दर्जाची शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध झाली आहे. आई व बाळाला सुरक्षित संसर्ग विरहित वातावरण मिळण्यासाठी खास डिझाईन केलेले सुसज्ज डिलिव्हरी रूम साकारण्यात आले आहे. याशिवाय

प्रसूती अधिक सुलभ, सुरक्षित आणि कम्फर्टेबल करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाची आधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व रिपोर्ट ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येतात. ओपीडी मध्ये रूग्णांना जास्त वेळ वेटिंगला थांबण्याची आवश्यकता नसणार आहे.

९ वर्षांच्या वाटचालीत सरस्वती हॉस्पिटलला रूग्णांनी कायम मोठा प्रतिसाद दिला आहे. हे विश्वासाचे नाते अधिक घट्ट करण्यासाठीच सुपर स्पेशालिटी आरोग्य सेवांचा विस्तार करण्यात आला आहे. हॉस्पिटलच्या या विस्तारामुळे परिसरातील रुग्णांना आता मोठ्या शहरात जाण्याची गरज भासणार नाही. सर्व अत्याधुनिक सुविधा आता आपल्या शहरातच उपलब्ध झाल्या आहेत.

डॉ.जाधव यांनी सांगितले की, ९ वर्षांपूर्वी एक ध्येय समोर ठेवून सरस्वती हॉस्पिटलची मुहूर्तमेढ रोवली होती. या काळात नेहमीच सर्वोत्तम सेवा देण्याचा प्रयत्न केला आहे. मोठ्या महानगरांमध्ये मिळणाऱ्या आरोग्य सुविधा नगरमध्ये तुलनेने कमी दरात उपलब्ध करून दिल्या. हॉस्पिटलच्या प्रवासात सुरक्षित डिलिव्हरी सह. २० हजारांहून अधिक शस्त्रक्रिया केल्या आहेत. ८०० पेक्षा अधिक आरोग्य शिबिरे घेतली आहेत. प्रधानमंत्री सुरक्षा मातृत्व योजनेंतर्गत अनेक महिलांच्या मोफत तपासणी केल्या. याशिवाय महिला सक्षमीकरणासाठी जोडी तुझी माझी, दिल ये जिद्दी है, पत्र लेखन, प्रेगनन्सी फॅशन शो, अहमदनगर फॅशन शो असे अनेक उपक्रम राबवून महिलांना निखळ आनंद मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. रूग्णांवर उपचार करण्याबरोबरच त्यांना आनंदी जीवनाचा मंत्र देण्याचा प्रयत्न असतो. रूग्णांना उच्च दर्जाच्या सेवेची हमी देणारे नॅशनल ॲक्रेडीशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स ॲण्ड हेल्थकेअर प्रोव्हायडर्स (एनएबीएच) या संस्थेचे मानांकन हॉस्पिटलला प्राप्त झाले आहे. विस्तारित सेवांसाठी स्टाफला विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे.

हॉस्पिटलमध्ये प्रसूतीपूर्व व प्रसूतीपश्चात तपासणी, वेदन विरहित प्रसूती, किशोरवयीन समुपदेशन, लग्नापूर्वी व गर्भधारणेपूर्वीचे समुपदेशन सल्ला केंद्र, अनियमित पाळी व पीसीओडी उपचार, मेनोपॉज मार्गदर्शन तसेच वंध्यत्व निवारण आदी उपचार सुविधा उपलब्ध आहेत. शासनमान्य कुटुंब कल्याण व गर्भपात केंद्र, लैंगिक समस्या मार्गदर्शन, कर्करोग निदान व उपचार, पॅथॉलॉजी लॅब, कॅशलेस सुविधा उपलब्ध आहेत. विविध शाळा, कॉलेज, महिला संस्थांच्या कार्यक्रमांना हजेरी लावून डॉ.जाधव आरोग्याचा व महिला सक्षमीकरणाचा मंत्र देत असतात. स्त्री रोग तज्ज्ञ डॉ.प्राजक्ता जाधव यांनी वंध्यत्व निवारणावर विशेष अनुभव मिळवला असून त्याचा अनेक महिलांना लाभ होत आहे.

आरोग्यसेवेतील आधुनिक तंत्रज्ञान सरस्वती हॉस्पिटलमध्ये आणून त्याव्दारे रूग्णसेवा देण्यावर कायम भर देण्यात आला आहे. या जोडीलाच डॉ.जाधव यांनी आनंदी समाजाच्या निर्मितीसाठी सातत्याने विविध उपक्रम राबविले आहे. आरोग्यसत्ताक चळवळीतून त्यांनी संपूर्ण नगर शहर निरोगी, आरोग्यसंपन्न आणि आनंदी राहिल यादृष्टीने महत्वाचे पाउल उचलले आहे. या अंतर्गत महानगरपालिकेच्या सहकार्यातून विशेष जनजागृती करण्यात आली. कोणताही आजार अंगावर न काढता वेळीच योग्य उपचार, तपासण्या करून घेण्याचे आवाहन ते करतात. आजारावर उपचार करतानाच मुळाच आजार होवूच नये यासाठी जीवनशैलीत कोणते बदल करावेत यासाठीही हॉस्पिटलतर्फे सातत्याने विविध उपक्रमातून जागृती केली जाते. हॉस्पिटलची दशकपूर्तीकडे यशस्वी वाटचाल ही प्रामाणिक आणि विश्वासार्ह आरोग्य सेवेची वाटचाल असून रूग्णांचा विश्वास हाच यशस्वितेचा मुख्य स्तंभ असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.

# बास्केटबॉलच्या स्पर्धेकरीता १३ वर्षाखालील मुला-मुलींच्या संघ निवड चाचणीचे आयोजन

नगर – महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल संघटना व सातारा जिल्हा बास्केटबॉल संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने ३ ते ८ मे रोजी १३ वर्षाखाली मुला–मुलींच्या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेकरिता अहमदनगर जिल्ह्याचा संघ पाठवायचा आहे. त्याकरिता २६ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता अहमदनगर डिस्ट्रिक्ट बास्केटबॉल असोसिएशन व अहमदनगर जिल्हा हौशी बास्केटबॉल संघटना यांच्या वतीने निवड चाचणीचे आयोजन केले आहे. निवड चाचणीसाठी येताना खेळाडूने जन्म दाखल्याची झेरॉक्स, आधार कार्ड झेरॉक्स, निवड चाचणी शुल्क रुपये २५० सोबत आणणे आवश्यक आहे. निवड चाचणीसाठी खेळाडूंचा जन्म १ जानेवारी २०१३ किंवा त्यानंतरचा असावा. या निवड चाचणीसाठी निवड समिती सदस्य म्हणून चंद्रशेखर म्हस्के, सचिन आळकुटे, योगेश चव्हाण व सचिन भापकर हे काम पाहणार आहेत. चाचणीसाठी खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन अहमदनगर डिस्ट्रिक्ट बास्केटबॉल संघटनेचे सचिव कैलास शानबाग व सहसचिव संजय ढोणे, पियुष लुंकड व मुकुंद काशीद यांनी केले आहे.

निवड चाचणी सावेडी जॉगिंग ट्रॅक बास्केटबॉल कोर्ट या ठिकाणी होईल. निवड चाचणीसाठी सत्यन देवळालीकर (७९७२०९७७०३), ओमसिंग बायस (९९७००६३०६३) व सचिन भापकर (९०२८९९०३९७).

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# 'न्यू लुक्स युनिसेक्स सलून'तर्फे आयोजित 'हेअर स्टायलिंग मास्टर-क्लास'ला प्रतिसाद



नगर – 'न्यू लुक्स युनिसेक्स सलून'तर्फे आयोजित एकदिवसीय 'हेअर स्टायलिंग मास्टर–क्लास'ला प्रतिसाद लाभला. प्रोफेसर चौक परिसरातील 'रोज गोल्ड' बँक्वेट हॉलमध्ये पार पडलेल्या या कार्यशाळेत सेलिब्रिटी हेअर स्टायलिस्ट मिस्टर शानू यांनी आपल्या कलेची जादू सादर करत उपस्थितांना भारावून टाकले. या मास्टर–क्लासमध्ये पुरुषांचे आधुनिक हेअरकट्स, महिलांसाठी प्रगत हेअर स्टायलिंग तंत्र आणि इंटरनॅशनल हेअर कलरिंग यांचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्यक्ष मॉडेल्सवर सादर करण्यात आलेल्या 'लाईव्ह डेमो'मुळे सहभागी प्रशिक्षणार्थींना बारकावे सहज समजले.

यासोबतच ग्राहकांशी प्रभावी संवाद कसा साधावा, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसा हेअरकट कसा निवडावा आणि सलून व्यवसाय अधिक यशस्वी कसा करावा, याबाबत 'वन–टू–वन कन्सल्टेशन'द्वारे विशेष मार्गदर्शन देण्यात आले.

### सेलिब्रिटी स्टायलिस्ट मिस्टर शानू यांनी उलगडले जागतिक हेअर स्टायलिंगचे रहस्य

अहिल्यानगरसह जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या तरुण हेअर आर्टिस्ट, सलून मालक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

'सलून'चे मालक रोहित संजय सागळगिले आणि नम्रता रोहित सागळगिले यांनी सांगितले, सलून उद्योगातील मालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी एक दर्जेदार व्यासपीठ निर्माण करण्याचा आमचा उद्देश होता. या कार्यशाळेद्वारे जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान आणि कौशल्य आपल्या शहरात आणण्याचा प्रयत्न केला.

यावेळी मिस्टर शानू म्हणाले, अहिल्यानगरसारख्या शहरात इतका उत्साह आणि शिकण्याची जिद्द पाहून आनंद झाला. योग्य मार्गदर्शन आणि सततचा सराव असेल, तर येथील कलाकार निश्चितच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण करू शकतात.

कार्यक्रमाचे नियोजन 'न्यू लुक्स' टीमने केले. सर्व सहभागींचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. अधिक माहितीसाठी न्यू लुक्स युनिसेक्स सलून, गुलमोहर रोड, आनंदनगर, मर्चंट बँक समोर अहिल्यानगर

